अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मनाचा गुण होय.

# संपादकीय

**प्रावीण्या**च्या डिसेंबरच्या अंकांत श्री. जोशीराव यांनी ' परलोकविद्या " या विषयावर आम्हास एक अनावृत पत्र लिहिलें आहे. त्यांत विशेष उत्तर देण्यासारखा नवीन मुद्दा तर नाहीच, पण आमच्या मुद्यांनाही त्यांनी उत्तरें दिलेलीं नाहीत. त्यांनी कांही गैरसमज उत्पन्न करणारीं विधानें मात्र केलीं आहेत, तेव्हा त्यांचा येथे समाचार घेणें जरूर आहे. " हा उद्योग सुरू करण्यापूर्वीच श्री. ऋषि सेवानिवृत्त झाले होते, निदान या विषयाचा प्रचार करण्याकरितां त्यांनी जागा सोडली नाही, " अशी आम्हास मिळालेली माहिती आम्हीं दिली. त्यावर श्री. जोशीराव म्हणतात, " यावरून आपण हें दिग्दर्शित करतां कीं आपणांप्रमाणे श्री. ऋषींनी ' त्याग ' केलेला नाही." हें साफ खोटें आहे. श्री. ऋषींशीं आमची स्वतःची तुलना करण्याची कल्पना देखील आम्हास कधीं शिवली नाही, किंवा आम्हीं स्वतःच्या ' त्यागा 'ची कधीं जाहिरातहि केलेली नाही. आमची माहिती चुकीची आहे असें धरून चाललें, आणि श्री. ऋषि हे अत्यंत थोर गृहस्थ असून त्यांनी ' त्याग ' केला आहे असेंहि म्हटलें, तरी त्यावरून अर्थातच त्यांचीं मतें खरीं ठरत नाहीत. श्री. ऋषींसंबंधी आम्हीं स्वतःच्या खात्रीलायक माहितीने एकच विधान केलें होतें कीं डॉ. इरावती कर्वे या श्री. ऋषींबरोबर एकाच बोटींतून यूरोपांत जात असतां त्यांनी श्री. ऋषींना अशी विनंति केली होती कीं आपले परलोकविद्येसंबंधी प्रयोग मला पहायचे आहेत, ते होतील तेव्हा मला कृपा करून कळवा. श्री. ऋषींनी जहाजावर असे प्रयोग केले, परंतु त्यांनी इरावतीबाईंना एकदांही कळवलें

नाही, व याचें कारण त्यांनी शेवटीं असें सांगितलें की आपण मला कोठें सांपडलां नाहींत. जहाजावर ही गोष्ट कितपत शक्य आहे याचा वाचकांनी विचार करावा. यावर मखलाशी करून श्री. जोशीराव जें उत्तर देतात, तें वाचून हंसू येतें. श्री. ऋषींनी कळवलें नाहीं, हें तर नाकबूल करतां येत नाही. तेव्हा ते आतां म्हणतात की प्रयोगाच्या वेळा गुप्त नव्हत्या व तेथे येण्यास बाईंना मनाई नव्हती. हें सरळ उत्तर नव्हे, हा लपंडाव आहे. बाईंना कळवण्याची तसदी घेण्याची जर श्री. ऋषींची इच्छा नव्हती, तर त्यांना प्रथमच म्हणतां आलें असतें की मी तुम्हाला कळवणार नाही, प्रयोगाच्या वेळा गुप्त नाहीत, तेथे कोणालाहि परवानगी आहे, जरूर असेल तर वेळा कोणत्या आहेत हें शोधून काढा आणि तेथे या. त्यांनीं असेंहि सांगितलें नाही आणि वेळाही सांगितल्या नाहींत, यावरून असा सरळ निष्कर्ष निघतो की चिकित्सक बुद्धीचीं माणसें श्री. ऋषींना नको असतात, किंवा निदान या बाई तेथे नसतील तर बऱ्या असेंच त्यांना वाटलें असलें पाहिजे. आतां श्री. जोशीराव वकिली लढवून जें उत्तर देतात, ती केवळ मागून सुचलेली युक्ति आहे, प्रामाणिक उत्तर नाहीं, हें कोणालाहि दिसेल. श्री. जोशीरावांचें म्हणणें असें की श्री. ऋषींच्या अंगांत सौजन्य नाही असें पाहिजे तर कोणी म्हणावें, त्याला त्यांची हरकत नाहीं. पण सरळ प्रचारकार्य करणाराची ही वृत्ति नव्हे. प्रयोगांसंबंधी कोणी जिज्ञासा दाखवली तर त्याला ते पाहण्याची संधि दिली पाहिजे, असेंच प्रचार करणाराला वाटेल. परंतु श्री. ऋषींना तसें वाटत नाही यावरून वाचकांनी काय तें समजावें.

हॅरी प्राइस यांच्या पुस्तकांतून आम्हीं अनुकूल तेवढे उतारे घेतले, असा श्री. जोशीराव यांचा आणखीं एक आक्षेप आहे. परंतु ही टीकेची सर्वमान्य पद्धत आहे. प्राइस हे गृहस्थ आमच्यासारखे नास्तिक नाहीत, परलोकविद्येंत कांहीतरी तथ्य आहे असें मानणारे आहेत. आमच्यासारखे लोक सर ऑलिव्हर लॉज सारख्यांच्या भोळसट वृत्तीची चेष्टा करतील यांत नवल नाही, पण हॅरी प्राइस हे आमच्यापैकी नसतांनाहि ते या शास्त्रज्ञासंबंधी आमच्यासारखेंच मत देतात, ही विशेष सांगण्यासारखी गोष्ट आहे, आणि म्हणूनच आम्हीं ती सांगितली.

यांत श्री. जोशीरावांना विषाद कां वाटावा? ते स्वतः जेव्हां आपल्याला अनुकूल असतील तेवढ्याच शास्त्रज्ञांचा उल्लेख करतात, तेव्हा तेही याच मार्गाचा अवलंब करतात. मग तो मार्ग इतरांना कां बंद असावा? अर्थात् कांही शास्त्रज्ञांचाच उल्लेख ते करतात, यांत अशी कबूलीच होते की बहुतेक सर्व शास्त्रज्ञ त्यांच्या विरुद्ध आहेत, आमच्या बाजूचे आहेत. आतां हॅरी प्राइस यांना आम्ही नाम-साद्दश्यामुळे 'सायकिकल रिसर्च सोसायटी'चे अध्यक्ष समजलों, ही आमची चूक आहे, परंतु तिला कोणतेंहि विशेष महत्व नाही. कारण हॅरी प्राइस यांनीहि या विषयांत जन्म घातला आहे. त्यांचीं कांही मतें आम्ही वादाकरतां पुढें करतों, यावरून त्यांचीं सगळींच मतें आम्ही कबूल केलीं पाहिजेत असें होत नाही हें उघडच आहे. तेव्हा हौडिनीसंबंधी त्यांचें मत कांहीहि असलें तरी आम्हाला त्याची परवा नाही. प्रयोगांचा खरेपणा मॅस्केलीन यांनी मान्य केला असें श्री. जोशीराव म्हणतात. हें आमच्या ऐकिवांत नाही, परंतु तें खरें धरून चाललें तरीहि मॅस्केलीनने कबूल केलें म्हणून आम्ही कबूल करावें असें होत नाही. मॅस्केलीनचे सहकारी डिव्हँट यांनी आपल्या ताज्या पुस्तकांत सर ऑलिव्हर लॉज यांच्या आचरटपणाची पुनः एकदां चेष्टा केली आहे आणि त्याचा पुरावा दिला आहे. तसेंच कॉनन डॉइल हे पूर्ववयांत बुद्धिप्रामाण्यवादी होते असें श्री. जोशीराव सांगतात. तसें असलें तरी उतार वयांत कांही लोकांना बुद्धिभ्रंश होतो इतकाच त्याचा अर्थ आहे. तसा आम्हाला झालेला नाही. मेंदूशिवाय विचार करतां येतो, आणि ते विचार दुसऱ्याला कळवण्याची इच्छा होते, इतकेंच नव्हे तर ते विचार दुसऱ्याच्या हाताने लिहून दाखवतां येतात, या गोष्टी खऱ्या मानायला बुद्धिभ्रंशच होणें जरूर आहे. एरवीं शास्त्रीय ज्ञानाचा ज्यांना थोडातरी गंध आहे, त्यांना त्या खऱ्या वाटणार नाहीत.

बक्षिसाची योजना आमची स्वतःची नव्हती व नाही. अशा गोष्टींची चिकित्सा करण्याकरतां श्री. रा. ज. गोखले यांनी पुणें येथें 'चिकित्सामंडळ' नांवाची एक संस्था काढली आहे, आणि त्या संस्थेने मृतात्म्यांचें अस्तित्व सिद्ध करणारास बक्षिस लावलेलें आहे. त्यांचा पत्ता '१७, डेक्कन जिमखाना

कॉलनी, पुणे--४.' असा आहे. तेव्हा आव्हान स्वीकारल्याचें आम्हाला अनावृत पत्रांत लिहून उपयोग नाही, तें त्यांना कळवलें पाहिजे.

हे संशय घेणारे लोक स्वतः येऊन प्रयोग कां पहात नाहीत, असा एक प्रश्न श्री. ऋषि व त्यांचे पित्त्ये करीत असतात. परंतु चौकशीअंतीं असें समजतें की प्रयोग पहाणें असल्यास श्री. ऋषींच्या संस्थेचा सभासद व्हावें लागतें आणि सभासद व्हायचें म्हणजे महिना दोन रुपयेप्रमाणें निदान तीन महिन्यांची वर्गणी आगाऊ भरावी लागते. तेव्हा ज्यांचा विश्वास नाही त्यांच्याकडूनहि पैसे उकळण्याची ही युक्ति आहे. अशा रीतीने श्री. ऋषींच्या खिशांत पैसे ओतण्याची आमची बिलकुल इच्छा नाही. विश्वास ठेवणारे बावळट लोक पुष्कळ असतातच, तेव्हा आमच्यावाचून त्यांना कांही कमी पडेल असें नाही. असल्या खुळांना आमच्यासारख्यांनी पैशाची मदत करावी असें कोणीहि समंजस मनुष्य म्हणणार नाही.

---

# शेतकीचा नवा जमाना आणि लोकसंख्येचा प्रश्न–१

लोकसंख्येच्या नैसर्गिक वाढीच्या मानाने अन्नाची उत्पत्ति वाढणें शक्य नसल्यामुळे कोणत्याहि देशांत लोकांची उपासमार होण्याची वेळ केव्हातरी येऊन ठेपणें अपरिहार्य असतें, हा माल्थस ने शोधून काढलेला सिद्धांत खोटा आहे अशी अनेकांनी वेळोवेळीं ओरड केलेली आहे. तथापि तो गणितावर आधारलेला असल्यामुळे खोटा ठरणें कठिण आहे. तो खोटा असल्याची जे ओरड करतात, त्यांना तो सिद्धांत काय आहे हेंच पुष्कळ वेळां माहीत नसतें. कार सॉंडर्स सारख्या विद्वान लेखकानेहि अशी ओरड एकदां केली होती, परंतु त्यानेहि विचारांतीं तो सिद्धांत कबूल केला आहे. इतकेंच नव्हे तर तो खरा झालेला आज बहुतेक देशांत दृष्टीस पडतो.

# शेतकीचा नवा जमाना

एकंदर पृथ्वीचा विचार केला तर तिचें एकंदर क्षेत्रफळ ३३०० कोटि एकर आहे, परंतु यांपैकी सुमारें १३०० कोटि एकरच काय ती लागवड करण्यासारखी जमीन आहे. एकंदर जगाची लोकसंख्या १९२५ सालीं १७० कोटि होती आणि गोऱ्या लोकांच्या देशांतील लोकसंख्या दर साल शेंकडा एक या दराने वाढत होती, तेव्हा लोकसंख्येची वाढ चक्रवाढ व्याजाप्रमाणे होत असल्यामुळे ती पुढे अमुक वर्षांनी किती होईल याचा गणिती अंदाज करणें सोपें होतें.

अन्नासंबंधी हिशोब प्रो. ईस्ट यांनी केला होता, त्यावरून अमेरिकन लोकांच्या दर्जाने रहाणारांना माणशीं ३.२ एकर उदरनिर्वाहाला लागतात असा त्यांचा अंदाज होता, आणि शेतकींत थोडीबहुत सुधारणा होईल असें धरलें तरी निदान माणशीं अडीच एकर जमीन तरी जरूर पाहिजे असें त्यांनी म्हटलें आहे. या हिशोबाने पृथ्वीवरील सर्व जमिनींचें उत्पन्न फारतर ५२० कोटि लोकांना पुरणें शक्य आहे, आणि लोकसंख्या दरसाल शेंकडा एक याप्रमाणे वाढते असें धरलें तर इतकी लोकसंख्या होण्यास फारतर शंभर सवाशें वर्षें लागतील आणि नंतर कांही लोकांची उपासमार होऊं लागेल असें त्यांनी ठरवलें. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांपुरता हिशोब करतां तेथे ८० ते ९० कोट एकर लागवडीची जमीन आहे, परंतु ती सर्वच चांगली नसल्यामुळे तींतून फक्त १६ कोट माणसांचें पोट भरेल असेंही त्यांनी ठरवलें.

परंतु लोकसंख्येची वाढ अशा दराने होईल, हेंच सर्वांना कबूल नव्हतें. उदाहरणार्थ प्रो. रेमंड पर्ल यांनी एक नवीन सिद्धांत मांडला, त्याप्रमाणें अमेरिकेची लोकसंख्या २० कोटिपेक्षा जास्त कधींच होणार नाहीं, आणि इतकी व्हायला ७५ वर्षें लागतील. पण ही देखील १६ कोटिपेक्षा जास्तच आहे. तेव्हा तरीदेखील उपासमारीची वेळ येणारच, किंवा निदान बाहेरून अन्न आणतां आलें नाही तर लोकांना अधिक गरीबीनें रहावें लागणार.

इतर कांही लेखकांनी असें ठरवलें की ही लोकसंख्या १६ कोटिचेहि वर कधी जाणार नाही, आणि उपासमारीची वेळ येणारच नाही. याचें एक

कारण असें की पुष्कळ देशांतील जन्ममान हल्ली कमी झालें आहे, आणि हें असेंच कमी होत गेल्यास लोकसंख्येच्या वाढीची भीति नको इतकेंच नव्हे तर ती कमी होत जाण्याचीहि भीति कित्येकांना वाटूं लागली आहे. तें कांही असलें तरी इतकें मात्र खरें की प्रत्येक मनुष्याला अडीच एकर लागतात असें धरल्यास हल्लीच यूरोपांतील कोणत्याहि देशांत लोकसंख्येला पुरेशी जमीन नाही, आणि या देशांतील लोक अजून उपाशीं मरत नसले तर त्याचें कारण इतकेंच की या देशांत व्यापाराच्या जोरावर अन्न बाहेरून आणतां येतें. हा व्यापार म्हणजे कारखान्यांत तयार केलेल्या वस्तु परदेशीं विकायच्या, आणि त्यांच्या मोबदल्यांत कच्चा माल व अन्न विकत घ्यायचें. परंतु हा व्यापार कोठपर्यंत चालेल ? इतर देशांनी तसलेच कारखाने सुरू केले नाहीत तेथपर्यंतच चालेल, आणि आतां सर्व जगभर सर्व प्रकारचे कारखाने झपाट्याने होत आहेत. तेव्हा असा व्यापार फार दिवस चालण्याची आशा नाहीं. हा व्यापार मुख्यतः वसाहतींशीं व काबीज केलेल्या मुलखांशींच होत असल्यामुळे वसाहतींकरतां आणि काबीज मुलखाकरतां यूरोपीय देशांत युद्धें होत असतात. परंतु अशा देशांतहि आतां कारखाने निघत आहेत. तेव्हा असा व्यापार फार दिवस चालणार नाहीं हें उघड आहे.

व्यापार हा उपासमार टाळण्याचा तात्पुरता मार्ग झाला. याशिवाय दुसरा मार्ग म्हणजे जमिनीचें उत्पन्न वाढवणें. यांत १९२५ सालापर्यंत फारशी प्रगति झाली नव्हती, परंतु आतां केवळ परंपरेवर भिस्त न ठेवतां शेतकींतील तज्ञ आतां शास्त्रीय मूलतत्वांपर्यंत जाऊन भिडले आहेत, आणि यामुळे कोणत्या जमिनींत कोणतें बीं पेरलें असतां किती कमाल पीक निघणें शक्य आहे, हें त्यांना गणिती काटेकोरपणाने निश्चित सांगतां येतें, आणि अशा गणिती हिशोबानें त्यांना असें दिसलें आहे की एका माणसाच्या पोषणाला अडीच एकर जमिनीची बिलकुल जरूर नाही, एका मनुष्याचें पोषण पाव एकर जमिनींत होऊं शकेल आणि दरसाल शेंकडा एक या मानाने जरी लोकसंख्या वाढत राहिली तरी देखील उपासमारीची वेळ निदान ३५० वर्षेंपर्यंत येणार नाहीं. अर्थात् याने माल्थसचें तत्व खोटें ठरत नाही, पण त्याची मर्यादा मात्र बरीच लांब जाते. यालाच आम्हीं

शेतकीचा नवा जमाना असें वर म्हटलें आहे.

जुन्या जमान्यांतील हिशोबाने ज्यांत लोकसंख्येला पुरेशी जमीन आहे असे देश म्हणजे फक्त कॅनडा, आर्जेंटीना, न्यू झीलंड, रशिया, अमेरिका (संयुक्त संस्थानें), व ऑस्ट्रेलिया इतकेच होते, परंतु नव्या जमान्यांत जगांतील प्रत्येक देशाला हल्लीच्या लोकसंख्येला भरपूर पुरेल इतकें अन्न सहज उत्पन्न करतां येईल. मात्र शेतकींत आधुनिक ज्ञानाचा व पद्धतींचा उपयोग सर्रास झाला पाहिजे.

प्राचीन काळीं जेव्हा मनुष्याची उपजीविका मुख्यतः शिकारीवर आणि चराऊ जमिनीवर असे, तेव्हा एखाद्या गटांतील लोकसंख्या वाढली म्हणजे जमीन पुरेनाशी होई व आणखी आसपासची जमीन उपयोगांत आणण्याचा ते प्रयत्न करीत. ती जमीन मोकळी असली तर ठीक, परंतु तेथे अगोदरच दुसरा गट आलेला असला म्हणजे लढाईची वेळ येई, आणि हीच स्थिति अजूनहि आहे. युद्धाचें प्रमुख कारण हेंच आहे. शेतकीचा शोध लागल्यावर अर्थातच तितक्या जमिनीवर जास्त लोकांचें पोट भरूं लागलें, परंतु तरीदेखील जमीन पुरत नाहीशी झाली म्हणजे लढाईची वेळ आलीच. शेतकींत कांही सुधारणा झाली म्हणजे त्याच जमिनींतून जास्त उत्पन्न निघे, पण अन्नाची वाढ लोकसंख्येच्या वाढीला तोंड देऊं शकत नाही, हा माल्थसचा सिद्धांत पुन्हाहि अनुभवास येई. यूरोपीय देशांत शेतकीला कारखान्यांची जोड मिळाली, पण तीहि फार दिवस चालणार नाही हें वर पाहिलेंच.

अर्थात् कांही आंकडेपंडितांनी असा सिद्धांत मांडला आहे की जगाची लोकसंख्या २००कोटींचे वर कधी जाणारच नाही, आणि शेवटीं देखील सरासरीने प्रत्येकाच्या वांट्याला साडेसहा एकर जमीन येईल, तेव्हा घाबरण्याचें कारण नाही. परंतु यांत आणखी एक अडचण आहेच, की जगांत अन्न पुरेसें उत्पन्न झालें तरीहि तें सर्वांना मिळावें कसें? हल्लीही कित्येक म्हणतातच की जगांत पुरेसें अन्न उत्पन्न होत आहे, आणि त्याला पुरावा देतात की अमेरिकेंत गहूं जाळावा लागतो, कारण गिऱ्हाईक नाही. परंतु तरी देखील हल्ली जगांत

लोक उपाशी मरतात हें सर्वांना दिसतें. तेव्हा अन्न पुरेसें उत्पन्न झालें, तरीहि तें लोकांपर्यंत पोंचत नाही तोंपर्यंत त्याचा उपयोग नाही. नव्या शेतकींतील तज्ञांचें म्हणणें असें की प्रत्येक देशांत पुरेसें अन्न उत्पन्न करतां आलें म्हणजे ही अडचण राहणार नाही.

परंतु हें तत्वज्ञान झालें. सध्यांची स्थिति अशी आहे की कित्येक देश आम्हाला पुरेशी जागा नाही म्हणून ओरड करीत आहेत. अर्थात् याचा अर्थ पुरेसें अन्न नाही असाच आहे, आणि ते आपली शेतकी सुधारण्याचा प्रयत्न करण्याऐवजी युद्ध करीत आहेत. युद्धापेक्षा शेतकी स्वस्त आहे आणि माणुसकीला धरून आहे, परंतु हें ज्ञान त्यांना अजून आलेलें नाही. हें ज्ञान शेतकीतज्ञांना आहे, परंतु त्यांचा सल्ला घेण्याइतकी अक्कल राज्यकर्त्यांना नसते. यासंबंधी योग्य दिशेने प्रयत्न फक्त रशिया व इटली या दोन देशांत झालेले आहेत. तरीपण इटलीला हें अजून चांगलेंसें उमजलेलें नाही, कारण तो देश युद्धाच्याच मार्गांत आहे.

या बाबतींत कांहींना कदाचित् असें वाटण्याचा संभव आहे की प्रत्येक देशांत गहूं उत्पन्न करण्याची जरूरी कोठे आहे ? अमेरिकेंत जर इतका गहूं पिकतो, तर त्यांतला पुष्कळ गहूं त्यांना बाहेर पाठवतां येईल. पण कोणताहि देश झाला तरी तो केवळ परोपकाराकरतां कोणताहि पदार्थ बाहेर पाठवणार नाही. अमेरिकेने जर गहूं बाहेर पाठवायचा, तर त्याऐवजी कांहीतरी पदार्थ इतर देशांतून अमेरिकेंत आले पाहिजेत, एरवी त्या गव्हांची किंमत कशी भरून यायची ? पैशांत किंमत येणें शक्य आहे असें म्हटलें तर पैशाचा प्रत्यक्ष उपयोग मुळींच नसून तो केवळ देवघेवीच्याच उपयोगाचा आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे. म्हणजे अमेरिकेला कांहीं पदार्थ विकत घ्यायचे असतील तरच त्या पैशाचा उपयोग, एरवी नाही. म्हणजे व्यापार हा केवळ पैशाने चालणार नाही, पदार्थांच्या देवघेवीवरच व्यापार चालेल. तरमग अमेरिकेला कोणताहि पदार्थ बाहेरून आणण्याची गरज नसली, तर अमेरिकेचा गहूं इतरांना मिळावा कसा ? प्रत्येक पदार्थ आपल्याच देशांत व्हावा, आणि होतां होईल तों बाहेरून

आणावा लागूं नये, अशीच सर्व देशांची खटपट असते, आणि असें एकदा झालें म्हणजे व्यापार जवळजवळ बंद होईल. अर्थात् जपानी रेशीम, अमेरिकन कापूस, ब्रेझिलची काफी, किंवा फ्रान्सचें मद्य, अशा इतरत्र उत्तम न होणाऱ्या पदार्थांना नेहमी मागणी राहीलच, परंतु या पदार्थांचा व्यापार थोड्या प्रमाणावर राहिला तरी अन्नाकरतां त्यावर अवलंबून राहतां येणार नाही. आपल्या देशांतील कांही पदार्थांची इतर देशांना जरूर असेल तरच इतर देशांतून अन्न किंवा इतर पदार्थ आणतां येतील. एरवीं गव्हांऐवजी बटाटे, लोण्याऐवजी मार्गेरीनसारखे पदार्थ, आणि कातड्याऐवजी कागद वापरण्याचा प्रसंग हल्ली जसा युद्धाचे वेळीं कित्येक देशांवर येतो, तसा शेवटीं सर्वांवर येईल.

अशा स्थितींत ज्या त्या देशाने आपल्या स्वतःच्याच उत्पन्नावर विसंबण्याचा प्रसंग येईल, आणि अशा प्रसंगीं काय करावें हें ठरवावें लागेल. युद्ध कोणालाहि मनापासून नको असतें, पण अन्न नाहीसें झाले म्हणजे 'बुभुक्षितः किं न करोति पापं' अशी स्थिति येते, आणि मूळचा सुस्वभावी मनुष्य देखील दुसऱ्याचा गळा कापायला तयार होतो, कारण भुकेने मरण्यापेक्षां युद्धांत मरण आलेलें केव्हांही बरें असें कोणालाहि वाटतें. नव्या शेतकीने यांतून एक माणुसकीचा मार्ग काढला आहे, त्याने युद्ध केल्याशिवाय अन्न मिळवणें शक्य होईल. तेव्हा समंजस लोक तो पसंत करतील यांत शंका नाही. (अपूर्ण)

(या लेखमालेतील माहिती ओ. डब्ल्यू. विलकॉक्स यांच्या 'नेशन्स् कॅन लिव्ह ॲट होम' या पुस्तकांतून घेतली आहे. **संपादक**)

---

# पापाचें फळ

( लेखिका, शकुंतला परांजपे. )

गोपाळ विलायतेंतून परत आला होता. अतिशय हुशार मुलगा. बसला असता तर आय. सी. एस. ची परीक्षा पहिल्या सटक्यासरशी पास झाला असता. परंतु बाळाचे विचारच विलक्षण. नोकरी करायची नाही, धंदा करायचा, असें

तो शाळेंत असल्यापासून म्हणत असे. फार काय, महारचांभाराचा कां होईना, पण धंदा करायचा, असेंहि तो बडबडे. पहिल्यापहिल्याने सर्वांनी त्याचें म्हणणें हंसण्यावारी नेलें. परंतु गोपाळ एकदां मावशीकडे खेड्यावर गेला असतांना रस्त्यावर एक ढोर मरून पडलेलें त्यानें पाहिल्याचें निमित्त झालें. कावळे आणि घारी त्याला टोंचीत होतीं, सर्वत्र घाण सुटली होती. तेव्हांपासून मेलेल्या किंवा मारलेल्या ढोरांपासून काय माल निष्पन्न होऊं शकेल, याचाच तो सारखा विचार करूं लागला, आणि बी. एस्सी. झाल्यावर विलायतेंत कातडीं कमावण्याचें शिक्षण घेऊन आला. परत आल्यानंतर चामड्याच्या एखाद्या मोठ्या कारखान्यांत हा नोकरी करील अशी सर्वांची अपेक्षा होती, परंतु हा कोठेच अर्ज करीना. सहा महिने गांवोगांव हिंडत मात्र होता. त्याला पुष्कळ मुलीहि सांगून आल्या, परंतु तो कोणाला डोळ्याखाली घालण्यासहि तयार नव्हता. एक दिवस त्याने एका खाटकाशीं संधान बांधलें आणि त्याच्याशीं करार करून, मारलेल्या प्राण्यांचे टाकाऊ अवशेष घेऊन, त्यांपासून चामडीं, खत, चरबी, गोंद, इत्यादि जिन्नस तयार करण्यास गोपाळने सुरवात केली. पहिल्यापासूनच बाळाचें लक्षण ठीक नव्हतें. आतां तर शिकस्तच झाली. ब्राम्हणाच्या सुशिक्षित मुलाने चांभाराचा धंदा करायचा म्हणजे काय ? आणि एका अशिक्षित मुसलमान खाटकाशीं व्यवहार ! मुलगा अगदींच ऐकत नाही असें पाहून वडिलांनी त्याला वेगळें बिऱ्हाड करायला सांगितलें. आईनें गोडीगुलाबीनें त्याला वळणीवर आणण्याचा प्रयत्न केला. " पहा बरं गोपाळ ! हे चाळे कांहीं चांगले नव्हत. अशांनी तुला मुलगी द्यायला सुद्धा कोणी तयार होणार नाहीं."

" कटकट चुकली, आई. सुंठीवांचून खोकला गेला."

" म्हणजे काय ? लगीन नाही का करायचं तुला ? का केली आहेस तिकडे एखादी मडम ?"

" मडम नाहीं केली." गोपाळनें आश्वासन दिलें. आईचा जीव खाली पडला.

" होय ना ? आहेसच माझा मुलगा ! आतां एवढं बरीक ऐक माझं, हा चांभाराचा धंदा दे सोडून. "

" छे छे आई. तेवढं मात्र सांगूं नकोस."

"मग लगीन तरी लवकर उरकून घे. कारण तूं असला घाणेरडा उद्योग करतोस असं सगळ्या लोकांना एकदां समजलं, की गरीब ब्राम्हणाची सुद्धां मुलगी मिळणं कठिण जाईल.

" हवी आहे कुणाला ब्राम्हणाची मुलगी ? "

" मग काय महाराचांभाराची मुलगी करणार आहेस कीं काय ? का त्या मुसंड्या खाटकाची करणार आहेस ? "

" महाराचांभाराची करीन, मुसलमानाची करीन, नाहीतर अनाथाश्रमांतली करीन. " आई बिचारी गप्पच झाली.

सुमारें एक वर्षाने गोपाळने खरोखरच एका अनाथाश्रमांतील लेंकुरवाळ्या मुलीशीं नोंदणीविवाह केला. निरुद्योगी लोकांना बोलायला आयताच एक विषय मिळाला. आपल्या उपवर मुलीशीं लग्न करण्यासंबंधी गोपाळला विचारून निराश झालेले दोनचार बाप म्हणूं लागले, " अहो चांभारसुद्धां या धेडाला मुलगी द्यायला कबूल नाहीत, मग पंकांत रुतलेल्या गाईखेरीज दुसरं कोण मिळणार ? " त्यावर लगेच गांवचे एक बातमीदार म्हणतात, " त्याने अनाथाश्रम सुद्धां पुष्कळ पालथे घातले म्हणतात. अहो त्या तसल्या बायकांना तरी हा मढीं फाडणारा नवरा हवा ना पसंत पडायला ? " तिसरे एक बृहस्पति उद्गारले, " तो खाटीक म्हणे या कारट्याला म्हणत होता, ' मुसलमान हो, माझी मुलगी देतों.' " आणखी एक विद्वान डोळा मिचकावीत म्हणतात, "अहो नाहीतर याचीच असेल ती कोणीतरी. धाक घातला असेल तिने गुपित फोडायचा. माहीत आहे का, एक मुलगी सुद्धां आहे म्हणतात रांडेला." "बस बस, मग याचेंच तें काम. लोकाचं कारटं पोसायला कोण तयार होईल हो ? " अशा तऱ्हेचे नाना तर्ककुतर्क चालत. वडिलांनी तर गोपाळचें नांव कधींच सोडलें

होतें. आई चोरूनमारून कधीं येऊन भेटत असे, तीहि आतां येईनाशी झाली. लाडू करंज्या तेवढ्या गोपाळकडे कधींकधीं पोहोंचत्या करी.

एक दिवस कामानिमित्त गोपाळ मुंबईला गेला होता. तेथे एका दुकानांत चहा घेत असतां अवचित त्याला एक जुना मित्र भेटला.

" ओहो, गोविंदा ! ओळखलं नाहीस मला ? "

" मी न ओळखायला काय झालं ? अरे बडा साहेब तूं. जुन्या ओळखी विसरायचा हक्क तुझा आहे, माझा नाही. "

" पुरे कर. बडा कसला अन् साहेब कसला घेऊन बसला आहेस ? आमच्या गांवांतले लोक मला उंबरठ्यांत सुद्धां उभा राहूं देणार नाहीत, माहीत आहे ? "

" तें आलं आहे म्हणा माझ्या कानीं. "

" काय म्हणतोस ? परगांवीं सुद्धां बातम्या इतक्या लवकर पोंचतात ? "

" न पोंचायला काय झालं ? बातम्याच तशा आहेत ना ? "

" तशा म्हणजे कशा रे ? "

" तें तुझं तुला माहीत. "

" पण तुझ्या तोंडून ऐकूं दे कीं. "

" वा राव, तुमचे प्रताप मी तुम्हाला सांगूं होय ? " " सांगेनास कां ? "

" ऐक तर मग. रागावूं नको हो पण. आपलं ऐकलं तें सांगतों—असं म्हणतात कीं तूं खाटकाचा धंदा करतोस, आणि एका वेश्येशीं लग्न केलं आहेस. "

" एकंदरींत बातम्या खोट्या असल्या तरी खऱ्याशीं त्यांचा संबंध आहे खास. "

" स्पष्ट बोल बुवा. "

" मी खाटकाचा धंदा करीत नाही. पण एका खाटकाशीं व्यवहार मात्र करतों. " असें म्हणून गोपाळने आपल्या धंद्यासंबंधींची सर्व हकीकत गोविंदला सांगितली. लहानपणापासून त्यांची मैत्री होती. शाळेंत ते नेहमी बरोबर असत. त्यांचें कालेजचें शिक्षण मात्र वेगवेगळ्या गांवीं झालें होतें. तरी त्यांची

मैत्री कायम राहिली होती. ते सुट्टींत भेटत तेव्हां एकमेकांजवळ सर्व हृद्गत ओकीत. परंतु त्यांनी पत्रापत्री कधीं केली नाही. वास्तविक पाहतां खऱ्या मैत्रीला पत्राची जरूरच नसते. दहा वर्षांनी भेट झाली तरी दहा मिनिटांत एकमेकांच्या अंतःकरणाचा ठाव पूर्ववत् मिळूं शकतो. तद्वत् दहा वर्षांनी जरी नाही तरी गोपाळ विलायतेस जाण्यापूर्वीं गोविंदला भेटला होता, त्यावर आतां भेटला. साहजिकच त्याने आपल्या लग्नाचा वृत्तांत सांगण्यासही हळूहळू सुरवात केली. "गोविंदा इतकीं वर्षे मीं एक गोष्ट तुझ्यापासून चोरून ठेवली होती. कालेजच्या तिसऱ्या वर्षी माझी एका मुलीशी ओळख झाली. रिकामा पाल्हाळ कशाला लावूं ? व्हायचं तें झालं. ती ब्राम्हणाची नव्हती. वडील लग्नाला कबूल होईनात. एकट्याच्या जबाबदारीवर तिच्याशीं लग्न करण्याचं धैर्य माझ्यांत नव्हतं. तेव्हा तिला डाक्टरकडे घेऊन जाण्याची गोष्ट मीं तिजजवळ बोललों. गोविंदा, काय सांगू ? त्यावेळीं तिनं नुसतं माझ्याकडे एकदां तिरस्कारानं पाहिलं आणि ती जी माझ्या खोलींतून निसटली ती मला पुनः कधींहि भेटली नाही. मीं तिचा पुष्कळ शोध केला, पत्रं लिहिलीं, पण व्यर्थ. तिच्या ओळखीच्या एका मुलीनं मात्र ती एका अनाथाश्रमांत गेली असल्याचं सांगितलं. आश्रमाचा पत्ता ती कांहीं केल्या सांगेना. मीं तीन चार आश्रमांत चौकशी सुद्धां केली. पण कोणीच कांहीं माहिती देईना."

"पण आतां मिळाली ना सगळी माहिती ? लग्न करून दोघं सुखी झालांत ना ? मग झालं तर."

"नाही रे ! आतां तरी ती कुठे सांपडली आहे ?"

"मग बृहस्पते ! लग्न कुणाशीं केलंत ?"

"हो खरंच. अरे तें म्हणजे माझ्या पापाचं क्षालन म्हणून मीं अनाथाश्रमांतल्या एका लेकूरवाळ्या मुलीशीं लग्न केलं. तिचा हिचा कांही संबंध नाही. ज्या आपत्तींत मीं एकीला लोटली, त्याच आपत्तींतून तिला नाही तर दुसरीला तरी बाहेर काढावी, एवढ्यासाठी मीं हें लग्न केलं."

" आहेस बाबा, जॉनसनचा अवतार आहेस ! " दोन्ही हातांनीं नमस्कार करीत गोविंद म्हणाला.

" त्यांनी काय केलं होतं, महाराज ? "

" तो लहान असतांना त्याच्या बापानं त्याला एका दुकानासमोर आपली वाट पहात उभं रहायला सांगितलं होतं. त्याप्रमाणं तो थोडा वेळ उभा राहिला, आणि पाऊस पडूं लागला तसा पळून गेला. पुढं बाप मेल्यावर कैक वर्षांनी त्या दुकानावरून जातांना स्वारीला या पुरातन गोष्टीची आठवण झाली. तेव्हा पश्चात्तापाचे अश्रू डोळ्यांत आणून हे शब्दकोशकर्ते त्या दुकानासमोर तासचे तास पावसांत भिजत उभे राहिले ! "

" थट्टा करतोस काय ? पण खरे थोर लोक असेच असतात बरं. "

" कबूल बुवा, तुम्ही थोर. आम्ही कांही तुमच्यासारखे थोर नाही ".

" कशावरून नाही ? तुझ्या हातून असं एखादं पातक घडतं तर तूंहि कदाचित् एक सोडून दोन अनाथ मुलींशीं लग्न केलं असतंस ! "

" कोण म्हणतं पातक घडलं नाही ? महाराज माझ्या हातून तुझ्यापेक्षा मोठं पातक घडलं आहे. एका मुलीच्या आत्महत्येला मी कारण झालों. काय सांगू गोपाळ, मुलगी पण मुलगी होती ! किती बुद्धिवान, किती बाणेदार, हं...जाऊं दे. " बोलतां बोलतां गोविंदाचा कंठ दाटून आला. पण हंसायचा प्रयत्न करीत तोच पुढें म्हणाला, " आतां तुझ्याप्रमाणं प्रायश्चित्त घ्यायचं तर मीं जीव द्यायला पाहिजे, नाही ? "

" चल, वेडा कुठला ? पढतमूर्ख असलं प्रायश्चित्त घेतील. माझा दोस्त नाही घेणार. " असें म्हणून गोपाळने त्याच्या खांद्यावर सांत्वनपर हात ठेवला. तेव्हां गोविंदाने गोपाळच्या पाठीवर जोराने थाप मारली आणि म्हणाला, "अरे पण मी कुठे चाललों आहें जीव द्यायला ? घाबरला लगेच ! मी तर लग्नाचा विचार करतों आहें. "

" आतां कसं बोललास ? "

" ऐक आतां माझं पुराण. माझ्याच शाळेंत एक विधवा मास्तरीण आहे. कधीं कुणाच्या अध्यांत नसते, मध्यांत नसते. काम संपलं कीं आपल्या मुलीला घेऊन घरीं जाते. किती गोड आहे तिची मुलगी! तिच्याशीं लग्न करण्याची माझी इच्छा आहे."

" आईशीं कीं मुलीशीं ?" " मुलगी तीन वर्षांची आहे, मूर्खा !"

" शाबास गोविंद, आणि म्हणे माझं अंतःकरण थोर नाही."

" नाहींच थोर. ती मला आवडते म्हणून मला तिच्याशीं लग्न करावंसं वाटतं. तुझ्याप्रमाणं पापाचं प्रायश्चित्त घेण्याकरतां नाही करावंसं वाटत."

" म्हणजेच तूं खरा थोर आहेस. व्यवहार म्हणून कोणीहि लग्न करूं शकेल. पण मूल असलेल्या विधवेवर कांही सामान्य माणसाचं प्रेम बसूं शकणार नाही."

" बरं बुवा, आहोंत आम्ही थोर. आमचं काय गेलं थोर म्हणवून घेण्यांत. तुमचेच मित्र पडलों! पण ती कुठें तयार आहे माझ्यासारख्या थोर माणसाशीं लग्न करायला ? सहा महिन्यांत तिने मला दोनदां नकार दिला. पण मी पडलों पक्का लोंचट. तेव्हा या वेळीं तिला माझी जरा कींव आली आहेसं दिसतं. संध्याकाळीं भेटायला बोलावलं आहे."

" मग जा बुवा लवकर. मलाहि संध्याकाळच्या गाडीनं परत गेलं पाहिजे. पुरे चार दिवस झाले घर सोडून."

" घरची बरीच ओढ लागलेली दिसते आहे रे ? प्रायश्चित म्हणून लग्न केलंस ना ?"

" केलं असेल प्रायश्चित म्हणून. म्हणजे अजूनहि प्रायश्चित भोगतों आहें असं नाही हो! अरे माझ्याच्यानं आतां एक आठवडाभर सुद्धां तिला सोडून राहवणार नाही."

सुमारें दोन वर्षांनी या दोन दांपत्यांच्या भेटीचा अकस्मात् योग आला. राष्ट्रीय सभेच्या एका अधिवेशनाला दोघेहि सहकुटुंब आले होते. दोघांनी स्नेहपूर्ण नजरेनें एकमेकांकडे पाहिलें व नंतर परस्परांच्याकडे पत्नीकडे दृष्टि वळवली.

वज्राघात झाल्याप्रमाणे चौघांचींहि तोंडें एकदम काळीं ठिक्कर पडलीं. चौघेंहि गोंधळलीं, बावरलीं, ओशाळलीं, गांगरलीं, चांचरलीं. परंतु एकालाहि इतरांची तारांबळ दिसली नाही. जें तें आपल्याच गोंधळांत चूर होतें. इतक्यांत सभेचा एक स्वयंसेवक चौघांना नदीवर स्नान करून येण्यास सांगून गेला. चौघेंहि नदीवर गेलीं. गोविंद चांगल्यापैकीं पोहणारा आणि गोपाळची बायको कमला हीहि पोहण्यांत पटाईत होती. तीं दोघें लवकरच पैलतीराला गेलीं. गोविंद कमलेला म्हणतो, " एकूण आत्महत्येची थापच मारलीस तर ? "

"मुळीच नाही. तुला पत्र टाकलं आणि त्याच रात्रीं मी गळ्यांत धोंडा बांधून विहिरींत उडी टाकली. पण त्या वेळींच फावलं कुणाला बाहेर परशुराम-पंताकडे जायला, आणि माझा सगळा बेत फसला. पुढलं तूं पाहतोसच."

"मुलीला कुठे ठेवलीस ? "

"तें सुद्धां कळलं वाटतं ? तुझ्या गौरीला आणि गोपाळच्या मुकुंदला घरींच ठेवून आलें. इथे सभेला कुठे आणायचीं मुलें ? "

"छान ! मुलांचं वर्गीकरण मोठं सुंदर केलंस ! "

"इकडे नदीच्या दुसऱ्या तीरावर गोपाळ आणि वेणू बोलत होतीं. वेणू म्हणाली, "आतां बिनब्राम्हणाची मुलगी चालते वाटतं ! "

"मी मिळवता असतों तर तेव्हाहि चालली असती. पण तूं माझं म्हणणं ऐकून घ्यायाला तरी कुठे तयार होतास ? आणि आतां शेवटीं विधवेचं सोंग पांघरून बिचाऱ्या गोविंदशीं लग्न केलंस ! "

"हां खबरदार ! गोविंदाजवळ मी कोणतीही गोष्ट लपवली नाही. फक्त तुझं नांवगांव तेवढं सागितलं नाही, अन् त्यानं मला कधीं विचारलंही नाहीं. आधीं मुळी मला लग्नच करायचं नव्हतं. पण सगळी हकीकत सांगितल्यावर सुद्धां जेव्हा गोविंदचं प्रेम कायम राहिलं, तेव्हा मात्र मी तयार झालें."

"क्षमा कर हं वेणू. उगीच मीं तुझ्यावर खोटेपणाचा आरोप केला."

कांही वेळाने चौघेंही परतलीं. बाह्यतः सगळीं शांत दिसत होतीं. मोजून मापून बोलत होतीं. तरी आंतून सर्वांचीं मनें अस्वस्थ होतीं.

दमल्याचें निमित्त करून कोणीहि अधिवेशनाला गेलें नाही. संध्याकाळ झाली तेव्हा बाजारांत जाण्याकरतां म्हणून गोविंद व गोपाळ बाहेर पडले. एकाने देशी विड्यांचीं दोन पुडकीं व दुसऱ्याने सिगारेटसचा एक डबा, इतकेंच सामान काय तें विकत घेतलें, आणि दोघेही डोंगराच्या बाजूला गेले. जीवश्च कंठश्च मित्र ते! एकमेकांजवळ हृदय उघडें केल्याविना त्यांच्याच्याने कसचें राहवतें? दोघेजण कितीतरी वेळ बोलले, कितीतरी वेळ स्वस्थ बसले. किती वाजले असतील याची शुद्ध एकालाहि नव्हती. बरोबर आणलेल्या विड्या आणि सिगारेटस् जेव्हा का संपल्या, तेव्हा मात्र दोघे शुद्धीवर आले. रात्रीचे बारा वाजून गेले होते. त्यांचीं अंतःकरणें एकजीव झालीं होतीं. परंतु देह दोन होते ना? बायकाहि दोन होत्या. सारें हृद्गत सांगितल्याने मुख्य प्रश्न थोडाच सुटतो? अखेरीस कोड्याचें उत्तर देण्याचें कठिण काम बायकांवर सोंपवण्याचें ठरवून ते दोघे परतले.

इकडे जसजशी रात्र होऊं लागली तशी या दोघींना चिंता वाटूं लागली. दहा वाजून गेले तरी हे जेव्हा आले नाहीत, तेव्हा दोघी शोधायला निघाल्या. बाहेरची थंड हवा लागतांच दोघीहि थोड्या शांत झाल्या, आणि चंद्रमा जेव्हा ढगांतून बाहेर आला, तेव्हा तर दोघींनी एका कातळावर प्रस्थान मांडलें. काळजीच्या ओझ्याखाली ओळख नसतांहि दोघींनी आपआपल्या पूर्व मित्रांची मनःस्थिति एकमेकींना समजावून सांगितली. दोघींनाहि परस्परांविषयी आपलेपणा वाटूं लागला. मन थोडें हलकें झाल्यावर दोघीहि आपल्या मुलां-विषयी बोलूं लागल्या. मग मात्र वेळ कसा गेला तो त्यांनाहि कळला नाही. इतक्यांत जवळच ओळखीचीं पावलें वाजलीं. वेणू म्हणाली, " या तुम्ही! वाट चुकलांत वाटतं कुठे?"

**गोपाळ**—नाही, बरेच दिवसांनी भेटलों होतों, सांगायचंहि पुष्कळ होतं. तेव्हा जे बसलों बोलत ते बसलों.

**कमल**—आणि जवळच्या विड्या संपल्या तेव्हा परतलां असाल. राम राम, काय घाण येते आहे!

**वेणू**—आतां स्वतः ओढायला लागल्याशिवाय कांहीं आपलं निभायचं नाही बाई.

**गोविंद**—बस गोपाळ, इथेच सांगून टाकूं.

**कमल**—कांहीं सांगायला नको, आम्हाला सारं समजलं आहे.

**गोपाळ**—मग बरंच झालं. ठरवा मग आतां तुम्हीच काय तें.

**वेणू, कमल**—काय ठरवायचं ?

**गोविंद**—तुम्हाला कोणचा नवरा हवा तो. आपलीं लग्नं झालीं आहेत नोंदणीपद्धतीनं. तेव्हा तुम्हाला पहिला संबंध श्रेयस्कर वाटल्यास घटस्फोट घेऊन फिरून लग्न करतां येईल.

**वेणू**—आणि समजा आम्हाला दोघींना एकच नवरा हवा असला तर ?

**गोविंद**—मग...मग...जो तुम्हाला पसंत असेल तो दोघींशीं लग्न करील. कबूल, गोपाळ ?

**गोपाळ**—कबूल.

**कमल**—म्हटलं नोंदणीविवाह आहे. दोन बायका करतां येणार नाहीत बरं का !

**वेणू**—( वेडावीत ) म्हणे दोघींशीं लग्न करील. आशाळला लगेच. दोन बायका हव्यात नाहीं का ? पण काय रे, आमच्यापैकीं एकीनं जर म्हटलं कीं मला दोन्ही नवरे हवेत, तर व्हाल का कबूल सवती व्हायला ? काय हरकत आहे ? दोघींनाही दोघांपासून मुलं आहेत, एकाशीं गांधर्वविवाह झाला आहे, एकाशीं नोंदणीविवाह झाला आहे.

**कमल**—तेव्हां निवड कसली करायची ? आहे असंच चालूं दे.

**वेणू**—जेव्हा चालू नवऱ्याचा कंटाळा येईल तेव्हा अदलाबदल करावी. मधूनमधून प्रेमपात्र बदलल्याखेरीज विवाह यशस्वी होतच नाही मुळी. काय हो, विद्वान ?

**गोविंद**—अग पण हळू बोला. सभेपुढं ठराव मांडताहेत जशा !

( गोष्टींतील सर्व पात्रें काल्पनिक आहेत. ) **शकुंतला परांजपे**

---

# वैयक्तिक टीका आणि शिष्टाचार

गेल्या नवंबरमध्यें कल्याण येथे भरलेल्या साहित्यसंमेलनांत पुढील ठराव मांडण्याचें काम आमचेकडे आलें होतें, व तो तेथे बहुमतानें पास झाला. "वृत्तपत्रीय व्यक्तिविषयक टीका जरी समाजधारणेच्या दृष्टीने आवश्यक असली तरी अशी टीका अनिर्बंध व असत्य स्वरूपाची असतां कामा नये व अशा प्रकारच्या टीकेस आळा बसण्याचें एक उत्तम साधन म्हटलें म्हणजे ज्या जागीं व जितक्या ठळकपणें विवाद्य टीका आली असेल, त्याच जागीं व तितक्याच ठळकपणें त्या टीकाविषयक व्यक्तीकडून आलेलें उत्तर छापणें हें होय. तरी सर्व नियतकालिकांस वरील धोरण स्वीकारण्याची या संमेलनाची विनंति आहे. त्याचप्रमाणें या स्वरूपाचा कायदा असावा असें या संमेलनाचें मत आहे."

वरील सूचना संपादकांस करण्याची संमेलनास जरूर भासावी ही अत्यंत शोचनीय स्थिति आहे, कारण खरें पाहिलें तर हा केवळ संपादकीय शिष्टाचाराचा प्रश्न आहे आणि कोणताहि प्रामाणिक संपादक अशा रीतीने आपोआपच वागेल अशीच अपेक्षा कोणीहि करील. परंतु हा साधा शिष्टाचार शिष्ट समजलेलीं पत्रें देखील पाळीत नाहीत असें जगभर आढळून येतें, आणि म्हणूनच अशा प्रकारची सूचना करावी लागते. मोठमोठ्या पत्रकारांना शिष्टाचार कळत नाही असें म्हणणें धाडसाचें होईल, तेव्हा त्यांना सूचना देऊनहि कांही उपयोग होईलच असें नाही. आणि म्हणूनच असा कायदा असावा असेंहि मत प्रदर्शित करावें लागतें.

असें कां होतें हें समजणें कठिण नाही. संपादक कितीहि सज्जन असला, तरी ज्याप्रमाणें प्रामाणिक वकील देखील अशिलाकरतां खोटें बोलायला मागेपुढें पहात नाही, त्याचप्रमाणें संपादकहि आपलें सौजन्य संपादकीय खुर्चीवर बसतांना बाजूला ठेवतात. कारण संपादकांनाहि एक प्रकारची वकिलीच करायची असते. आपली खाजगी समजूत कांहीहि असो, आपल्या राजकीय किंवा सामाजिक

पक्षाचा विजय होईल अशाच रीतीने संपादकाला वागावें लागतें, अशी एक समजूत आहे, आणि यामुळेच संपादक शिष्टाचार विसरतात आणि त्यांना त्याची आठवण करून द्यावी लागते, आणि एवढ्यानेही न भागल्यामुळे कायदे करावे लागतात. याचमुळे वरील ठराव एकमताने पास न होता बहुमताने पास झाला, आणि वृत्तपत्रव्यवसायांतीलच कांही लोकांनी विरुद्ध मतें दिलीं. यावरून सामान्य नागरिकांच्या संरक्षणाकरतां वर सुचवलेल्या कयद्याची किती जरूरी आहे हें मात्र उत्तम रीतीने सिद्ध झालें.

फ्रान्समध्यें अशा प्रकारचा कायदा आहे, निदान फ्रान्स हिटलरच्या ताब्यांत जाईपर्यंत होता, आणि यामुळे तेथे अब्रूनुकसानीचे खटले फारच कमी असत असा अनुभव होता. बदनामीसंबंधी कायदा आहेच, तेव्हा उत्तर छापण्याचें कारण नाही, असें कांही पत्रकार म्हणतात. परंतु उठल्यासुटल्या कायद्याकडे धांव घेणें सर्वांनाच शक्य नसतें हें सहज समजण्यासारखें आहे, आणि याचा फायदा घेऊन संपादकांनी एखाद्या व्यक्तीवर खरेखोटे आरोप करून त्या व्यक्तीकडून आलेलें उत्तरहि न छापणें हा अत्याचार आहे. अशा वेळीं विरुद्ध पक्षांतील पत्रें हें उत्तर छापतील यांत शंका नाही, परंतु अशाने त्याच वाचकांपुढे तें उत्तर जात नाही, कारण दोन्ही पक्षांचीं पत्रें वाचणारे वाचक फार थोडे असतात. तेव्हा त्या उत्तराचा व्हावा तितका परिणाम होत नाही. म्हणून वर सुचवलेल्या कायद्याची अत्यंत जरूरी आहे.

वैयक्तिक टीकेंत शिष्टाचार कोठपर्यंत पाळावा व अशा टीकेच्या मर्यादा काय असाव्या, यासंबंधी नियम घालून देणें कठिण आहे. वास्तविक ही गोष्ट संपादकांच्या सदभिरुचीवर सोडावी असें कोणाला वाटेल, पण संपादकांना सदभिरुचि असलीच तरी ती ते संपादकीय खुर्चीवर आपल्याबरोबर नेत नाहीत असें दुर्दैवाने पुष्कळ वेळां आढळतें. तेव्हा या शिष्टाचाराचा येथे थोडा विचार करणें भाग आहे. सभ्यतेचे सामान्य नियम पाळावे हें धोरण देखील सर्वच संपादक पाळीत नाहीत. असभ्य भाषेने लिखाणाला जोर येतो अशी कांहींची कल्पना असते, परंतु असभ्य भाषेशिवायहि जोरदार लिखाणाचीं पाहिजे तितकीं

उदाहरणें दाखवतां येतील. अर्थात् सर्वंच् लेखकांना हें साधत नाही हें निर्विवाद आहे, परंतु ही सबब असभ्य भाषा वापरण्यास पुरेशी नाही. असभ्य म्हणजे काय हेंच कळत नसल्याचें ढोंग कांही लेखक करतात आणि त्यांच्या लिखाणाला कोणी असभ्य म्हटलें तर 'असभ्य' हा शब्द देखील शिवी आहे असा कांगावा करतात. इतकें देखील भाषेचें ज्ञान ज्यांना नाही, ते काय दर्जाचें लिखाण लिहितील हें सांगायला नको.

सभ्यता आणि शिष्टाचार म्हणजे काय, हें ज्यांना खरोखरच कळत नसेल त्यांना कांही उदाहरणें देऊन हें स्पष्ट करतां येईल. सभेंत जी भाषा बोललेली चालणार नाही ती असभ्य, अशी सामान्यतः व्याख्या करतां येईल. निदान या शब्दाचा मूळ अर्थ असा आहे. सभेंत अशी भाषा कोणीं वापरल्यास अध्यक्षाकडे दाद मागतां येते व ती वापरणारांस सभेंतून घालवून देण्याचाहि अधिकार अध्यक्षांस असतो, व असें पार्लमेंटसारख्या आदर्श समजलेल्या सभांतूनहि कधीकधी घडतें. विशेषतः खोटें बोलण्याचा आरोप एखाद्यावर करणें हें असभ्य समजतात. तेव्हां प्रतिपक्षीयांवर देखील भक्कम पुराव्याशिवाय असा आरोप करणें हें शिष्टाचाराविरुद्ध आहे असें म्हणण्यास हरकत नाही. समाजाचे आपआपसांतले सर्व व्यवहार सुरळीत चालावे हाच शिष्टाचाराचा उपयोग आहे, आणि या शिष्टाचाराकरतां खोटें बोलण्याची देखील परवानगी असते, इतकेंच नव्हे तर खोटें बोलणें कधीकधी भाग पडतें, निदान आपले खरे विचार बाहेर न दाखवणें जरूर असतें. अर्थात् जेव्हा एखाद्यावर खोटें बोलल्याचा आरोप येतो, तेव्हा तो केवळ शिष्टाचार पाळण्याकरतां खोटें बोलल्याचा नसतो, कांहीतरी स्वार्थी हेतूनें खोटें बोलल्याचा असतो. असा आरोप कोणावर करणें म्हणजे त्याचें वैर संपादन करणेंच आहे. असा आरोप करणें कधीकधी जरूर असतें हें खरें, परंतु तो केल्यास त्याचा भक्कम पुरावा आपल्याजवळ असला पाहिजे. तो नसतां, केवळ एखादा मनुष्य कोर्टांत जाणार नाही, तेव्हा त्याच्यावर पाहिजे तो आरोप करायला हरकत नाही म्हणून असा आरोप करणें हा भेकडपणा आहे. ती असभ्यता आहे हें उघडच आहे.

अर्थात् अमुक मनुष्य खोटें बोलला, किंवा त्याला थापा मारण्याची संवय आहे, असें म्हणणें, आणि त्याने केलेलें अमुक विधान खोटें आहे असें म्हणणें, यांत जमीनअस्मानाचा फरक आहे, कारण एक बुद्धिपुरःसर खोटें बोलण्याचा आरोप आहे आणि दुसरा नाही, कारण खोटें विधान नजरचुकीनें किंवा अज्ञानानेहि होऊं शकतें. जेथे याबद्दल शंका असेल, तेथे बुद्धिपुरःसर खोटें बोलल्याचा आरोप न करणें हीच सभ्यता आहे.

त्याचप्रमाणें एखाद्याला मूर्ख म्हणणें हेंहि असभ्यच आहे. या बाबतींतहि अमुक विधान किंवा अमुक कृति मूर्खपणाची आहे असें म्हणणें वेगळें, आणि अमुक मनुष्य मूर्ख आहे म्हणणें वेगळें, कारण शहाणा मनुष्य देखील एखादे वेळीं मूर्खपणानें वागतो. तेव्हा सभ्यतेचा मार्ग हाच कीं कोणालाहि मूर्ख म्हणूं नये, त्याच्या कृतीला वाटल्यास मूर्खपणा म्हणावें. याही पलीकडे जाऊन एखाद्याला ‘ गाढव ’ म्हणणें असभ्य आहे हें सांगण्याची जरूर दिसत नाही, परंतु कांही लोक येथेही थांबत नाहीत. ‘ गाढव ’ या शब्दाचाहि अर्थ कोणी ‘ मूर्ख ’ असाच करील, तेव्हा तसें होऊं नये म्हणून अमुक मनुष्य गाढव आहे असें न म्हणतां तो दुगाण्या झाडतो असें म्हणणें हा असभ्यतेचा कडेलोट आहे.

शिवी कशाला म्हणावें हेंहि पुष्कळांना कळत नाही. अर्थात् शिमग्यांतल्या विशिष्ट प्रकारच्या शिव्या बहुधा वर्तमानपत्रांत येत नाहीत, परंतु कडक वैयक्तिक टीका आणि शिवीगाळ यांत फरक आहे. एखाद्याला मूर्ख म्हटलें तर तें असभ्य होईल, पण शिवी होणार नाही, कारण तें मनुष्याचें बरोबर वर्णन असणें शक्य आहे. परंतु एखाद्याला गाढव म्हणणें ही शिवी आहे, कारण ‘गाढव’ हें मनुष्याचें बरोबर वर्णन नव्हे. ‘तो दुगाण्या झाडतो’ हीहि अर्थातच शिवी आहे. एखाद्याला असभ्य म्हणणें ही अर्थातच शिवी नाही, किंवा असभ्यताहि नाही, कारण असभ्यतेचा योग्य आरोप एखाद्यावर करणें असेल तर तो यापेक्षा अधिक सभ्य भाषेंत करतां येतच नाही, आणि हें योग्य वर्णन असणें शक्य आहे. तेव्हा ‘असभ्य’ ही शिवी नव्हे. शिव्या देणाऱ्या लेखकांना पुष्कळ वेळां हें कळत नाही कीं शिव्या देण्याने त्या देणाराचा कमीपणा व्यक्त होतो, ज्याला

शिव्या दिल्या त्याचा होत नाही. ज्याला समर्पक उत्तर देतां येत नाही, किंवा मुद्देसूद टीका करतां येत नाही, तोच शिव्या देण्याचा मार्ग पतकरतो, एरवीं शिव्या देण्याचें कारण काय ? कधीं असेंहि होतें की एखाद्याचा स्वभावच शिवराळ असतो म्हणून तो शिव्या देतो, पण याचा अर्थ तरी हाच की त्याला मनाचा तोल संभाळतां येत नाही आणि तो क्षुल्लक कारणावरून संतापतो. हाही शिव्या देणाराचाच कमीपणा आहे आणि शिवाय अशा मनुष्याच्या शिव्या लिखाणांत येण्याचें कारण नाही. मनुष्य संतापून बोलतांना एखादे वेळीं मनाचा तोल जाऊन तो शिव्या देईल, आणि कित्येक प्रसंगी तें क्षम्यहि ठरेल, पण लिहितांना जास्त विचार करायला वेळ असतो, लिखाण पुनः वाचून पाहतां येतें, तेव्हा लिहितांना देखील ज्यांना तोल संभाळतां येत नाही ते लेखक नालायक आहेत असें म्हणणें भाग आहे.

वैयक्तिक टीकेसंबंधी आणखी एका मुद्याचा येथे उल्लेख करणें भाग आहे. कित्येक लोक असें म्हणतात की ज्यांना वैयक्तिक टीका करणें असेल त्यांनी निदान ती स्वतःच्या सहीनिशीं करण्याचें धैर्य दाखवलें पाहिजे, निनांवी करतां नये. या म्हणण्यांत आम्हास मोठासा अर्थ दिसत नाही. टीका सहीनिशीं असो की निनांवी असो, ती असभ्य असूं नये हें वर म्हटलेंच आहे. निनांवी टीकेची जबाबदारी ती प्रसिद्ध करणाऱ्या संपादकावर येते. तरमग ती निनांवी असल्यास बिघडलें कोठें ? निनांवी लिहिणारास धैर्य नसतें असें पाहिजे तर म्हणावें, पण तें नसल्यामुळे टीका खोटी ठरत नाही. कोणत्याहि लेखाची किंमत लिहिणाराच्या नांवावरून करण्याची दुष्ट खोडी बहुतेक वाचकांस असते, हेंच या आक्षेपावरून दिसतें. टीका योग्य असेल तर ती कोणीं लिहिली आहे हें पाहण्याचें कारण नाही. ती योग्य नसेल तर तिला समर्पक उत्तर देऊन तिची नांगी मोडतां येते. म्हणूनच हें उत्तर मात्र तितक्याच ठळकपणें त्याच वाचकांच्या नजरेसमोर आलें पाहिजे, अशाकरतां कायद्याची सूचना वर केली आहे. वस्तुतः धैर्य नसल्यामुळेंच मनुष्य निनांवी लिहितो असें नाही. नांवावरून लिखाणाची परीक्षा होऊं नये इतकाच त्यांत उद्देश असणें शक्य आहे. कित्येक प्रख्यात लेखकांनी सुरवातीला टोपणनांवाने लिहिल्याचीं

उदाहरणें विपुल आहेत. आपलें नांव कोणालाच माहीत नसल्यामुळे आपल्या लिखाणाला कोणी महत्व देणार नाही, म्हणून त्यांनी टोपणनांवें घेतलेलीं असतात. यांत धैर्याचा मोठासा संबंध नसतो. आणि समजा, धैर्य नसल्यामुळेंहि एखाद्याने टोपणनांव घेतलें, तरी त्यांत समाजाचें नुकसान नाही. जी टीका खरोखर व्हायला पाहिजे, अशी योग्य टीका देखील टीकास्पद व्यक्तीच्या विशिष्ट दर्जामुळे किंवा खाजगी नात्यामुळे सहीने करण्याचा धीर होत नाही, पण ती न होण्यांत समाजाचें नुकसानच आहे. तेव्हा कोणाहि संपादकाने निनांवी वैयक्तिक टीका छापूं नये हें हिताचें नाही. ती टीका योग्य असावी, आणि योग्य नसली तरी निदान सभ्य भाषेंत केलेली असावी, इतकें संपादकाने जरूर पहावें; नव्हे, हें पाहणें त्याचें कर्तव्य आहे, पण निनांवी वैयक्तिक टीका छापूंच नये म्हणणें योग्य नाही.

या आक्षेपाच्या मुळाशीं काय आहे हें पाहूं गेल्यास असें दिसतें कीं टीका जेव्हां योग्य असते आणि तिला समर्पक उत्तर देतां येत नाही, तेव्हा टीकाविषयक व्यक्तीला काय करूं आणि काय नाही असें होतें, आणि टीकेला उत्तर देण्याऐवजी तीं करणाराचीं कांही कुलंगडीं बाहेर काढतां आलीं तर पहावीं अशी इच्छा होते. अर्थात् हें टीकेला उत्तर होतच नाही, पण सूड उगवल्याचें समाधान त्याने लाभतें. पण टीका निनांवी असली तर असा सूड घेतां येत नाही, म्हणूनच वैयक्तिक टीका करणाराने सही करण्याचें धैर्य दाखवावें असें लोक म्हणतात. पण टीकेचें महत्व तींतील मुद्यांवर असतें, ती करणाराच्या नांवावर नसतें, हें विसरून चालणार नाही. उदाहणार्थ असभ्य वैयक्तिक टीका करूं नये असें प्रो. फडक्यांनी म्हटलें, तर यावर मुद्देसूद उत्तर न देतां कित्येकांनी त्यांना उत्तर दिलें कीं तुम्हींहि अशी टीका पूर्वी केली आहे. म्हणजे असभ्य टीका करावी कीं काय, हा मुद्दा बाजूलाच राहून हें केवळ बाजू उलटवण्याकरतां उत्तर झालें. अर्थात् प्रो. फडक्यांनी यावर असें म्हटलें कीं तसें असेल तर मागें मीं चूक केली, तशी आतां तुम्ही करूं नका. दारू पिऊं नका असा उपदेश करण्याचा अधिकार दारू पिणाराला नाही, असें पुष्कळ लोक जोराने म्हणतात, पण हा जोर फोल आहे. दारू पिण्याचे परिणाम जर वाईट असतील, तर ते दारू

पिणारालाच जास्त माहीत असणार. 'मग तो स्वतः तें व्यसन कां सोडीत नाहीं ?' असें कोणी म्हणेल. पण त्याचें उत्तर इतकच कीं व्यसन सोडणें कठिण असतें, इतकेंच नव्हे तर तें कित्येकांच्या शक्तीच्या बाहेर असतें. अशा प्रकारचीं उत्तरें न देतां लोकांनी मुद्यांचा निःपक्षपाती दृष्टीने विचार करावा, हा उद्देश निनांवी लिखाणाने साधतो, आणि हा अशा लिखाणाचा मोठाच उपयोग आहे.

लेखकांना कायद्याचे निर्बंध शक्य तितके कमी असावे असेंच आमचें मत आहे. परंतु ते निर्बंध नसले म्हणजे निदान सभ्यपणा तरी राखण्याची जबाबदारी प्रत्येक लेखकावर, आणि विशेषतः संपादकावर, येते. वर जी कायद्याची सूचना केली आहे, ती लेखकांवर निर्बंध घालण्याकरतां नव्हे, तर वैयक्तिक टकिमुळे कोणाला अन्याय होऊं नये इतकाच तिचा उद्देश आहे. गरिबांना कोर्टात जातां येत नाही म्हणून त्यांचेवर पाहिजे तशी वेडीवांकडी टीका करावी, हा अन्याय आहे. तो अंशतः तरी दूर करण्याचा उपाय म्हणूनच त्याचें उत्तर तितक्याच ठळकपणें छापावें, हा वस्तुतः संपादकीय शिष्टाचारच समजला पाहिजे. परंतु संपादक हा शिष्टाचार पाळीत नाहीत म्हणून कायद्याची आवश्यकता आहे. नागरिकांच्या हक्कांचा हा एक भाग आहे. सर्व सुधारणांच्या मुळाशीं पाहूं गेलें तर न्यायाचें आणि समतेचें तत्व असतें आणि तें असेल तरच ती सुधारणा म्हणतां येईल. या तत्वाचा अभाव म्हणजे रानटीपणा. संपादकांनी रानटीपणा आपण होऊन न सोडल्यास कायद्याने त्यांना भाग पाडावें हें रास्तच आहे.

---

# ' कॅन्सर ' संबंधी

लेखक, दि. बा. डोंगरे, डी. सी. ई.

आपल्या मासिकाच्या मागील एका अंकांत कॅन्सर रोगावर अजून औषध सांपडलें नाही असा आपण खुलासा केला आहे. तो खुलासा चुकीचा नाही, पण अपुरा आहे, कारण या उपाधीवर उपाय काय करावयाचा याबद्दल जगांत निर-

निराळ्या ठिकाणीं अभ्यास चालू आहे, व शास्त्रज्ञांना थोडेफार आशेचे किरण लाभले आहेत. हें वाचून वाचकांना निराश होण्याजोगी परिस्थिति आज नाही एवढें तरी कळेल. म्हणून डेट्रॉइट येथील हेन्री फोर्ड हॉस्पिटलचे मुख्य अधिकारी मॅक्क्ल्यूअर एम्. डी. यांनी प्रसिद्ध केलेली माहिती पाठवीत आहें.

कॅन्सरबद्दल खात्री झाली की उपाययोजना दोन प्रकारें केली जाते. एक शस्त्राच्या साह्याने त्याचें निर्मूलन करणें, किंवा 'क्ष' किरण किंवा 'रेडिअम' किरण यांचें साह्य घेऊन. पहिल्या प्रकाराने रोग मरत नाही हें खरें, पण त्याची वाढ मात्र खुंटते. दुसऱ्याने मात्र, दीर्घ कालाने कां होईना, पण रोगच मरतो.

ह्या रोगाने युक्त अशी एखादी पेशी जरी शरीरांत शिल्लक राहील तरी तो रोग आपले हातपाय अल्पावधींत पसरल्याशिवाय राहणार नाही. म्हणून या रोगाचा प्रादुर्भाव होत असतांनाच याच्यावर उपाययोजना करणें अत्यंत जरूरीचें व महत्वाचें आहे, कारण रोग थोड्याच जागेंत घर करून राहता, दूरवर पसरण्यास त्याला अवसर मिळत नाही, कारण अशा वेळीं शस्त्राने किंवा किरणाने त्यावर उपाययोजना यशस्वी रीतीने करणें सुलभ पडतें. रोगाने जर का एकदां शरीरांत घर केलें, तर मात्र कितीहि कौशल्याने उपाययोजना केली तरी जवळजवळ कांहींच उपयोग होत नाहीं असें म्हटलें तरी चालेल.

उपाययोजना अक्षम ठरते याचें मुख्य कारण आजारी लोक प्रथमावस्थेंतच डाक्तरकडे धांव घेत नाहीत. रोगी जर वेळींच तज्ञांची मदत घेतील तर कॅन्सरने मरणारांची संख्या ५० टक्के तरी खास घटवतां येईल. कॅन्सर बरा होऊं शकतो याची साक्ष खुद्द अमेरिकेंत २५०००० रोगमुक्त नशीबवान जवान देऊं शकतील. प्रथमावस्थेंतल्या रोग्यांपैकीं शेकडा ७० ते ९० टक्के रोगी निखालस बरे करतां येतात.

अमेरिकेंतील एक प्रसिद्ध प्रेसिडेंट ग्रोव्हर क्लीव्हलंड यांचें उदाहरण सर्वांच्या परिचयाचें आहे. त्यांच्या तोंडांत या रोगाचीं चिन्हें दिसलीं, पण कांही राजकारण-गौप्यसाधनासाठी त्यांना त्याबद्दल उच्चार करतां येईना. शेवटीं

गुपचुपपणें परगांवीं नेऊन त्यांच्यावर शस्त्रक्रिया केली. ती यशस्वी झाली आणि ते त्यानंतर १५ वर्षे जगून वयाच्या ७० व्या वर्षीं मरण पावले.

एकंदरींत कॅन्सर हा रोग असाध्य नाही, फक्त कष्टसाध्य आहे. या रोगाचें निर्मूलन करण्याची ताकद असलेलीं शस्त्रें व औषधें आपणापाशीं आहेत, पण रोग्यांनी प्रथमावस्थेतच त्यांचा फायदा घेतला पाहिजे. म्हणजे रोग्यांची संख्या कमी करण्याचें श्रेय डाक्तरांपेक्षा समाजालाच अधिक लाभूं शकतें.

रोगाचें प्राबल्य फार होऊन रोगी उपाययोजनेच्या आवांक्याबाहेर गेल्या-वर डाक्तरकडे येतात. त्यामुळे डाक्तरांचा कांहीच उपाय चालत नाही. कॅन्सर-संबंधी बऱ्याच रोग्यांना अंधुक संशय येतो, पण त्याबद्दल खात्री होईपर्यंत ते थांबतात. तेवढ्या कालांत रोगाचें आपोआप फावतें. त्यामुळे उपाययोजना कार्यक्षम असून सुद्धां डाक्तरांच्या पदरीं अपयशाचा वांटा येतो.

या रोगावर अर्धवट तज्ज्ञांकडून बरेच उपाय योजले जातात. त्यांपैकी कित्येकजण प्रतिज्ञेवर रोग बरा करण्याचीं अभिवचनें देतात. पण असें सिद्ध झालें आहे की शस्त्रक्रिया किंवा किरणक्रिया यांखेरीज हा रोग बरा होणें केवळ अशक्य आहे. सुवर्णमिश्रित भस्में, आसवें, रेडिअमचें पाणी, यांपासून तो लोहयुक्त रक्षेपर्यंत निरनिराळ्या औषधांची तथाकथित तज्ज्ञ मदत घेतात. एवढेंच नव्हे तर शस्त्रक्रिया टाळण्याबद्दल निक्षून सांगतात. पण त्यांत सर्रास लबाडी आहे असेंच समजावें. ते बिचारे पोटासाठी लबाडी करतात, पण त्यामुळे रोग्यांचें जीवित धोक्यांत पडतें.

कॅन्सर हा रोग इतका हट्टी आहे कीं एका रात्रींत त्यासंबंधीचें कोडें सोडवणें हा शुद्ध वेडेपणाच आहे. पण एवढें मात्र खरें की आजवरच्या परिश्र-मांनी बरेंच सिद्ध झालें आहे आणि क्षयरोगाबद्दल जितकी उपाययोजना आज उपलब्ध आहे, तितकीच कॅन्सरसंबंधीहि आहे. १९१० सालीं दर लक्ष मृत्यूंत क्षयरोगाचे मृत्यु १६० असत, तर १९३८ सालीं हें प्रमाण फक्त ४९ आहे. आतां औषधी योजनेला याचें सारें श्रेय नसून सामाजिक शिक्षणाला आहे.

कॅन्सरसंबंधी तेंच यश मिळवतां आलें तरी जग आज तेवढ्यावरच खुष राहण्यासारखें आहे.

कॅन्सरबद्दल आजतागायत माहिती सांगायची म्हणजे दोन गोष्टींबद्दल खुलासा करणें आवश्यक ठरतें. कॅन्सरवरील उपाययोजनेबद्दल संतत संशोधनात्मक प्रयत्न चालू आहेतच आणि लवकरच गुणकारी ठरेल अशी शस्त्रसामग्री आपल्या हातीं लागेल अशी आशा बाळगण्यास हरकत नाही. पण त्यांपैकी टॅंपल युनिव्हर्सिटीचे श्री. टॅंपल फियी ह्यांचा थंड उपाय, व डॉ. लॉरेन्स यांचें सायक्लोट्रोन हीं दोन उल्लेखण्याजोगीं आहेत.

मनुष्याच्या शरीराचें उष्णतामान साधारणपणें ९८°·६ डिग्री फॅरनहाइट असतें असें मानलें जातें. निरनिराळ्या अक्षांशांत राहणाऱ्या माणसांचें यापेक्षा कमीजास्त असूं शकेल, पण देहाच्या प्रत्येक भागाचें उष्णतामान सारखेंच नसतें. हातांचीं किंवा पायांचीं बोटें वगैरे अवयवांचें उष्णतामान कधीकधी बाकीच्या शरीरापेक्षा जवळजवळ २० डिग्री कमी असूं शकतें. कॅन्सरचें एक लक्षण असें आहे की तो खाकेंत, पायावर किंवा इतर तत्सदृश ठिकाणीं होत नाही. कारण कमी उष्णतामान असतांना हा रोग कमी होतो व उष्णता जास्त होतांच बळावतो. ज्या जागीं कॅन्सर झाला असेल तिचें उष्णतामान कमी ठेवल्यास रोग्याला बरें वाटतें व रोगाची वाढही कमी प्रमाणांत येते. प्रयोगाने असें सिद्ध झालें आहे की अशा जागेचें उष्णतामान एकंदर शरीरापेक्षा ४८° तरी कमी असणें मानवतें.

नंतर असा शोध लागला की ज्या जागीं कॅन्सर झाला आहे तो भागच नुसता थंड न करतां रोग्याचें सर्व शरीर बर्फांत ठेवायचें व नंतर गरम कपड्यांनी त्याचें कमी उष्णतामान वाढूं न द्यायचें, एवढेंच नव्हे तर तें ७५°–८०° या प्रमाणांत ठेवायचें, हेंच हितकारक आहे, कारण कमी उष्णतामानामुळे शारीरिक व्यापार मंदगतीने चालतात. अर्थात् कार्यक्षम मांसलतंतु या प्रयोगांत जीव धरून राहतात, पण कॅन्सरने अधू झालेले तंतु मरून जातात आणि इष्ट तो परिणाम घडून येतो.

टेंपल फियीने हें सिद्ध केलें असलें तरी अजूनहि हा प्रयोग पूर्णावस्थेस पोंचला नाही. तथापि सूक्ष्मदर्शक यंत्रामधून शास्त्रज्ञांना आशावादच दिसला आहे. कारण शस्त्रक्रिया करण्यापलीकडे गेलेल्या रोग्यांच्या बाबतींत सुद्धां थोडेंफार यश या पद्धतीने लाभलें होतें. अर्थात् तत्वतः तरी ही उपाययोजना यशस्वी आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

दुसरा शोध म्हणजे डॉ. लॅरेन्सच्या सायक्लोट्रोनचा. हाही प्रयोगावस्थेंत असला तरी फलदायी वाटतो आहे ही गोष्ट खरी. 'क्ष' किरणांप्रमाणें या यंत्राने विशिष्ट किरणें निर्माण केलीं जातात. 'क्ष' किरणांनी कॅन्सरचे तंतु मरतात, पण प्रमाणबद्धता नाहीशी झाल्यास इतर तंतूचाहि नाश होतो. तेव्हा कॅन्सर बरा करण्याकरतां वापरायचे किरण सामर्थ्याने असे हवे की कॅन्सरयुक्त तंतूंचा त्यांनी नाश करावा, पण देहांतील इतर सुष्ट तंतूंवर त्यांचा कोणताही वाईट परिणाम होऊं नये. केवळ या गुणावरच किरणांच्या उपाययोजनेची सुरक्षितता अवलंबून आहे. डॉ. लॅरेन्सचीं किरणें वरील गुणाने युक्त आहेत, म्हणूनच आशेचे किरण लाभणें शक्य झालें आहे.

हरतऱ्हेचे कॅन्सर कां होतात हें ठाऊक नाही, आणि तो रोग कसा टाळावा याची काडीचीहि माहिती नाही. तरी एवढें खरें की कॅन्सर झाल्यास तो कह्यांत कसा ठेवावा हें मात्र आज डाक्तरांच्या हातीं आहे. यापुढे नित्य नवे शोध लागतील पण त्यांकरतां आज थांबण्याची जरूरी नाही. निराश न होतां जनतेने या प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे, कारण कॅन्सर बळावला नसला तर तो बरा होतोच. त्याकरतां उपाययोजना आज शास्त्रज्ञांस अवगत झाली आहे, पण हयगय न करतां रोग्याने डाक्तरकडे लगेच धांव घेतली पाहिजे.

\+ + +

[ हें सर्व खरें आहे, परंतु तें अंमलांत आणणें कठिण आहे. वाचकांची निराशा करण्याची आमची बिलकूल इच्छा नाही, पण कॅन्सरच्या प्रथमावस्थेंत डाक्तरकडे धांव घ्यायची, म्हणजे ती प्रथमावस्था आहे हें रोग्याला कळलें पाहिजे. नाहीतर अंगावर कोठेहि कसलीहि पुळी दिसतांच प्रत्येकाने डाक्तरकडे गेलें

पाहिजे ! हें जवळजवळ अशक्य आहे. एकतर आपलें स्वतःचें शरीर इतक्या बारकाईने कोणी तपासीत नाही, आणि तपासलें तरी अशा रीतीने उठल्यासुटल्या डाक्तरकडे धांव घेणें फक्त श्रीमंतांनाच शक्य आहे. डाक्तरांची फी–विशेषतः तज्ञांची फी–देणें गरिबांना अशक्य असतें. तेव्हा कॅन्सरचें प्रमाण जर कमी करणें असेल तर सर्वांना नियमित वेळीं तज्ञांकडून फुकट तपासण्याची सोय झाली पाहिजे. इतकें करूनहि कॅन्सरची प्रथमावस्था लक्षांत येईलच असें नाही. कारण हा रोग शरीराच्या बाहेरच्या दृश्य भागालाच होईल असें नाही, तो शरीराच्या आंतल्या भागांनाही होऊं शकतो. असें झाल्यास प्रथमावस्थेची शंका सुद्धां येणार नाही. सं. ]

---

# फ्रान्समधील आरोग्याची वाढ

:o:

आरोग्याच्या दृष्टीने विशेष प्रकारच्या सोयींची जरूर शहरांतच जास्त भासते. खेड्यांत जागा व सूर्यप्रकाश अधिक विपुल असल्यामुळे तशा सोयी नसूनहि आरोग्याला विशेष बाध येत नाही. फ्रान्स देश स्वच्छतेबद्दल विशेष नांवाजलेला नाही, परंतु तेथेहि गेल्या दीडशें वर्षांत किती फरक पडला आहे, याचा विचार एका फ्रेंच लेखकाने केला आहे, त्यांतील कांही ठळक गोष्टी पुढें दिल्या आहेत.

शहरांत रस्त्यांत उजेड नसे, गटारें नसत, आणि घरांत पाण्याची सोय नसे. सतराव्या शतकांत बड्या लोकांच्या घरांत देखील फारसें सामान नसे. तथापि कांचेचीं झुंबरें असत आणि मालकाचा पलंग १२ फूट रुंदीचा असे, आणि भोंवतीं पितळेचा कठडा असे. भेटायला येणारे लोक बाजूच्या जागेंत बसत. स्त्रियांना घडीच्या खुर्च्या असत, आणि पुरुष त्यांच्या पायांशीं जमिनीवरच बसत. गाड्या नसत, तेव्हा घोड्यावरून किंवा चालत जावें लागत असे. रस्त्यांत अंधार असल्यामुळे रात्रीच्या वेळीं जाणाऱ्या प्रेमिकप्रेमिकांची त्रेधा होत असे.

पाऊस असला म्हणजे चिखल असे, तेव्हा बूट खराब होऊं नये म्हणून त्यावरून आणखी एक आच्छादन लागत असे. मात्र अशा लोकांबरोबर जाण्याकरतां रस्त्यांच्या कोपऱ्यांवर मशाली घेऊन नेहमी लोक उभे असत, यामुळे श्रीमंतांची अडचण होत नसे. लघ्वीकरतां आडोशाची जागा नसे. घरांतच एका बाजूला फरशी केलेली असे, तेथेच स्त्रियांनी व पुरुषांनीहि लघ्वी करण्याची चाल असे. तेथे स्त्रिया असल्यास पुरुषांनी दुसरीकडे पहावें इतकेंच.

शहरांत उजेडाचा व आरोग्याचा निकट संबंध असतो. प्रथम मेणबत्त्या, नंतर तेलाचे दिवे, नंतर धुराचे आणि नंतर विजेचे, अशा पायऱ्यांनी यांत सुधारणा होत गेलेली आहे. पहिल्या फ्रांस्वाच्या राज्यांत पार्लमेंटने १५३४ सालीं असा हुकूम काढला होता की शहरांतील प्रत्येक रहिवाश्याने रस्त्यावरच्या खिडकींत रात्रीं नऊ वाजल्यापासून एक मेणबत्तीचा कंदील लावून ठेवला पाहिजे. परंतु हा उजेड पुरेसा नव्हता असें दिसतें, कारण चौदाव्या लुईने पॅरिस व इतर शहरांत रात्रीं रस्त्यांतून जाणाऱ्या लोकांबरोबर कंदील घेऊन जाणारे लोक भाड्याने पुरवण्याचा मक्ता एका व्यापारी कंपनीला दिला.

शहराचें आरोग्य तेथील रस्त्यांवरहि बऱ्याच अंशाने अवलंबतें. त्या रस्त्यांची दिशा योग्य असल्यास शहरांत हवा खेळते आणि आरोग्याला मदत होते. या दृष्टीने नवीन रस्ते पाडण्याचें काम करण्याकरतां १७९३ सालीं, म्हणजे फ्रान्समधें प्रथम लोकशाही स्थापन झाल्याबरोबर, एक कमिशन नेमलें होतें. रस्त्यांत हवा खेळावी म्हणून आणि लोकांना करमणुकीकरतां मोकळ्या जागा आणि बागा शहरांत ठिकठिकाणीं ठेवण्याची एक योजना या कमिशनने तयार केली. पण नेहमीप्रमाणे ज्यांचा या योजनेने वास्तविक फायदा व्हावयाचा, त्यांजकडूनच तिला विरोध झाला. तथापि ती थोड्याबहुत अंशाने अंमलांत आलीच.

सतराव्या शतकांत रुग्णालयांची स्थिति तर भयंकर होती. सामान्य रोगी आणि मरणोन्मुख माणसेंच नव्हे तर प्रेतेंहि एकाच सर्वसामान्य खोलींत असत. वेड लागलेलीं माणसेंहि शेजारच्या खोलींत असल्यामुळे रोग्यांना झोप देखील येणें अशक्य असे. एकाच बिछान्यांत तीनचार गर्भिणी स्त्रिया,

पैकी कांहीं गर्ती स्त्रिया आणि कांही वेश्याहि असत, यामुळे रोगसंसर्गाचा आणि पोटांतल्या मुलांना इजा होण्याचाहि संभव असे. त्याचप्रमाणें बाळंत झालेल्या देखील चारपांच स्त्रिया एकाच बिछान्यांत असत. मरणो-न्मुखांकरतां आणि बिछाना खराब करणाऱ्या रोग्यांकरतां वेगळे बिछाने असत, परंतु एकेका बिछान्यावर पांचसहा माणसें असत. या बिछान्यांवर गवत पसरलेलें असे. शस्त्रक्रिया देखील इतर रोग्यांसमोरच होत असत आणि हल्ली-सारखीं गुंगीचीं औषधें त्यावेळीं नसल्यामुळे शस्त्रक्रियेचे वेळीं रोगी भयंकर किंचाळ्या फोडीत असत, आणि ज्यांच्यावर शस्त्रक्रिया व्हायची असेल त्यांनाहि त्या ऐकाव्या लागत असत. खरूजहि बऱ्याच लोकांना असे, आणि त्यांतच वावरल्यामुळे ती डाक्तरांना आणि परिचारिकांनाही लागत असे. अशा स्थितींत लोक इस्पितळांत जायला घाबरत असत यांत नवल नाही.

तीनतीन वर्षांनी दुष्काळ पडत असत. या वेळीं इस्पितळांतच गरिबांना अन्न देत असत. परंतु तें घ्यायला देखील लोक जात नसत, आणि त्यांना पोलिसां-कडून पकडून न्यावें लागत असे.

वर दिलेलें वर्णन सतराव्या शतकांतलें आहे. यांत मुख्य सुधारणा म्हणजे प्रत्येक रोग्याला वेगळा बिछाना देणें. परंतु तीही फारशी लवकर झाली नाही. रॅंस शहरांत १८२७ सालापर्यंत प्रत्येकाला वेगळ्या बिछान्याची सोय नव्हती. अर्थात् शंभर वर्षांपूर्वी इस्पितळेंहि फार थोडीं होतीं. सबंध फ्रान्स देशांत सातशें सार्वजनिक इस्पितळांत मिळून १,०५,००० माणसें असत. यांत पोरकीं पोरें, म्हातारीं माणसें आणि रोगी, या सर्वांचा समावेश होत होता.

# डाफ व ऊल वृत्तीचीं माणसें

लेखक, डॉ. के. भा. लेले, पुणें.

[ **टीप.** इंग्रजींत 'डाफ्ट' व 'फूल' हे शब्द मूर्ख, वेडा अशा अर्थाने वापरतात. ते कठोर लागतील म्हणून त्यांसारखे दिसणारे हे नवीन शब्द बनवले आहेत. ]

# डाफ व ऊल वृत्तीचीं माणसें

अमेरिकन मानसशास्त्री एडमंड शॅफ्टसबरी याने आपल्या ग्रंथांत शहाण्या व मूर्ख माणसांचीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत. त्याचें म्हणणें असें की ज्याला व्यवहार समजतो व तो आपल्या सोयीचाहि करून घेतां येतो तो शहाणा. याच्या उलट ज्याला व्यवहारच समजत नाही, व अर्थात् तो आपल्या सोयी-चाहि करून घेतां येत नाही तो मूर्ख समजावा. अशा मूर्खांचे त्याने दोन भेद केले आहेत. त्यांतील पहिला डाफ व दुसरा ऊल.

डाफ मनुष्याच्या मनांत एकादी भावना इतक्या दृढतेने व्यापलेली असते की तिला संभाळण्याकरतां असा मनुष्य सर्वस्व गेलें तरी त्याचें दुःख मानीत नाही. अर्थात् हा व्यवहार नव्हे. परंतु ऊल वृत्तीचा मनुष्य याहीपुढे गेलेला असतो. डाफप्रमाणे याच्याहि मनांत एकच भावना अत्यंत प्रबल झालेली असते, परंतु तीच मुळांत चुकीची असते. यामुळे त्याचे सर्व व्यवहार चुक-तात. असा मनुष्य अनेक वेळां बुद्धिमानहि असू शकतो व त्याच्या या व्यंगा-व्यतिरिक्त तो सर्व प्रकारचे व्यवहार उत्तम रीतीने करूं शकतो. यामुळे अशीं माणसें चटकन ओळखतां येणें अवघड पडतें.

महात्मा गांधींचें उदाहरण आपल्या विषयाला सर्वस्वी लागू पडतें, तें असें. सत्य व अहिंसा हें तत्व संभाळण्याकरतां गांधींनीं आजपर्यंत अनेक वेळां विसंगति व हेकटपणा दाखवलेला आहे, व त्यांत त्यांनी देशाचें कितीतरी नुकसान केलें आहे. त्यांतून त्यांचें सत्य व अहिंसा हीं त्यांची त्यांनाच समज-लेलीं नाहीत असें ते स्वतःच जन्मभर सत्याचे प्रयोग करूनहि कबूल करूं शकतात. यावरून त्यांची बुद्धि सर्वस्वी नष्ट झालेली नसून त्यांत थोडातरी स्पष्टोक्तीचा व सत्याचा अंश आहे एवढेंच सिद्ध होतें. आणि या कबुलीजबाबा-मुळें त्यांचे अनुयायी त्यांची स्तुति करतात ! परंतु त्यांना असें समजेना कीं अशा घोडचुका करणें हेंच मुळांत वेडेपणाचें आहे. हाच आमचा विजय, असें गांधी म्हणाले असते तर तेंहि त्यांच्या शिष्यांनी खरें मानलें असतें.

सत्य व अहिंसा या दोन्ही कल्पना मनुष्यजातीलाच काय, प्राणिमात्राला

अत्यंत प्रिय आहेत, परंतु तेवढ्याने भागत नाही म्हणून हिंसा करून जगावें लागतें हेंहि खरें आहे. याप्रमाणे सत्य म्हणजे गांधी म्हणतील तें व अहिंसा म्हणजे गांधी ठरवतील ती, आणि अशा प्रकारचें स्तोम माजवणाऱ्याला ज्या देशांत लक्षावधि अनुयायी मिळतात, त्याच्या अकलेची हद्द आहे !

अशाच तऱ्हेचें दुसरें वेड म्हणजे टकळी व चरख्याच्या जोरावर स्वराज्य मिळवणें. अशा वेड्याला हिंदुस्थानचे व्हाइसरॉय सुद्धां विचारविनिमयाला बोलावतात हें कसें ? या प्रश्नाचें खरें उत्तर एवढेंच की साहेब लोकांना या देशांतील लोकांची अक्कल समजलेली असल्यामुळें त्यांमधील मोठ्या महंताला गांठला म्हणजे त्यांत सर्व कांही आलें. अर्थात् हा इंग्रजांचा शहाणपणा आहे, तो आमचा नाही आणि गांधींचा तर नाहीच नाही.

महात्मा गांधींबरोबर ईश्वर बोलतो हें कसें ? याविषयी एवढेंच म्हणतां येईल की येशू ख्रिस्ताप्रमाणे त्यांनाही आपण ईश्वराचे लाडके पुत्र आहों असें वाटत असावें व आपल्याच हातून या देशाचा उद्धार होणार आहे असें त्यांना वाटतें. यामुळे हें सर्व ईश्वरच बोलतो असें ते सांगतात. परंतु हें खरें की खोटें हें आपण आज न ठरवतां आणखी शें दोनशें वर्षांनी तें आपोआपच निश्चित होणार आहे. ( ईश्वर बोलत नाही हें ठरवायला शेंदोनशें वर्षें थांबायला नको. **संपादक** ).

गांधींना हिंदुस्थान देशाची कळकळ आहे म्हणून त्यांनी सर्वस्वावर पाणी सोडलें हेंहि खरें आहे. यामुळे त्यांना वेडा न म्हणतां महात्मा म्हटल्यास चूकहि होणार नाही. याचा अर्थ एवढाच की पंढरपूरचा जसा विठोबा, तसा वर्ध्याचा महात्मा, यापेक्षा दोघांनाही व्यवहारांत महत्व नाही. हें गांधींच्या कट्टर शिष्यांना आतां तरी कळूं लागलें.

आपल्या मूळ विषयाला धरून डाफ व ऊल वृत्तीचीं कितीतरी माणसें आपल्या रोजच्या व्यवहारांत दृष्टीस पडतात. ज्यांना फारशी मिळकत नाही, ज्यांच्या मुलांच्या अंगावर पुरेसा कपडाही नाही, व ज्यांना पोटभर अन्न सुद्धां

मिळत नाहीं, अशा घरांतील मिळवत्या पुरुषांनीं नाटकांसिनेमांचीं थिएटरें भरून काढणें व चहाचिवड्याचीं दुकानें विभूषित करणें, हीं डाफ व ऊल वृत्तीचीं उदाहरणें आहेत.

तसेंच कोणी द्रव्यलोभाला बळी पडतात, कोणी विषयाला भुलतात, कोणी खोट्या स्वाभिमानाकरतां सर्वस्व खर्चितात, तर कोणी देव देव करीत मनाने स्वर्गातच आयुष्य कंठितात. हीं सर्व डाफ व ऊल वृत्तीचीं उदाहरणें आहेत.

---

# सनातनी अमेरिका

अमेरिकेंतील कनेक्टिकट संस्थानांतील वॉटरबरी शहरांत एका इस्पितळांत १९३८ च्या ऑक्टोबर महिन्यांत 'मॅटर्नल हेल्थ सेंटर' नांवाची संस्था सुरू झाली. ती डाक्टरांनी चालवलेली होती आणि तेथे फक्त विवाहित स्त्रियांना वैद्यकीय कारणांकरतां इष्ट वाटल्यासच संततिनियमनाची माहिती देत असत.

१२ जून १९३९ रोजीं पोलिसाने या संस्थेच्या जागेची झडती घेतली आणि तेथील कांही उपकरणें आणि रोग्यांची नोंद असलेले कागदपत्र जप्त करून नेले. यानंतर सुमारें पंधरा दिवसांनी तेथे काम करणारे दोन डाक्तर व एक नर्स यांना संततिनियमनाचे बाबतींत कायद्याविरुद्ध एका विवाहित स्त्रीस आरोग्य राखण्याकरतां एक रेतजंतुनाशक औषध आणि एक प्रतिबंधक उपकरण वापरण्याचा सल्ला दिल्याचे आरोपावरून अटक केली. या सल्ल्याप्रमाणें ती स्त्री नंतर वागली, व हाहि कायद्यांत गुन्हा असल्यामुळे त्या गुन्ह्याला मदत केल्याचाहि आरोप या सर्वांवर होता.

हा कायदा १८७९ सालचा आहे आणि अशा प्रकारचा कायदा दुसऱ्या कोणत्याहि संस्थानांत नाही. या कायद्यांत सांगितलें आहे की जी कोणी व्यक्ति गर्भधारणेचा प्रतिबंध करण्याचे उद्देशाने एखादें औषध किंवा इतर वस्तु वापरील, तिला कमींत कमी ५० डॉलर दंड आणि कमींत कमी ६० दिवस

आणि जास्तींत जास्ती १ वर्ष तुरुंगवासाची शिक्षा होईल; किंवा दंड व तुरुंगवास अशा दोन्ही शिक्षा देतां येतील. हा गुन्हा करण्यास मदत किंवा सल्ला देणार कोणी इसम असल्यास त्याने स्वतःच तो गुन्हा केला आहे असें मानून त्याला शिक्षा होईल.

हा कायदा जरी इतके दिवस कायद्याचे पुस्तकांत होता, तथापि वैद्यकीय कारणांकरतां संततिनियमनाचा सल्ला देण्याच्या डाक्तरांच्या हक्काला आजपर्यंत कधीहि विरोध झाला नव्हता. असें असून याच वेळीं हा खटला डाक्तरांवर करण्यांत आला याचें कारण म्हणजे तेथील रोमन कॅथोलिक पाद्र्यांच्या संस्थेने असा एक ठराव पास केला की संततिनियमन हें निसर्गविरुद्ध असल्यामुळे अनीतिकारक आहे अशी कॅथोलिक धर्माची शिकवण आहे, आणि वरील संस्थेवर वरील कायद्याअन्वयें फिर्याद करावी अशी त्यांनी मागणी केली. त्या शहरांतील प्रत्येक रोमन कॅथोलिक मंदिरांत ११ जून तारखेला ( रविवारीं ) प्रार्थनेचे वेळी ही घोषणा झाली, आणि दुसऱ्याच दिवशीं या संस्थेवर पोलीसने हल्ला केला. ( कपडे निसर्गविरुद्ध असल्यामुळे नागवें राहण्याचीही कॅथोलिक धर्माची शिकवण आहे काय ? **संपादक.** )

अर्थातच तिघां आरोपींपैकी कोणींहि गुन्हा कबूल केला नाही. आरोग्या-करतां संततिनियमनाचा सल्ला देण्याचा डाक्तरांचा हक्क आहे आणि कायद्याचा याच्या विरुद्ध अर्थ करणें हें संयुक्त संस्थानांच्या राज्यव्यवस्थेविरुद्ध आहे असें मत त्यांच्या वकिलाने दिलें आणि ७ आगस्टला वरच्या कोर्टाचे न्यायाधीश जज्ज केनेथ यांनीहि तसेंच मत दिलें. आणि या मताप्रमाणे त्या तिघांनाही नव्हेंबर रोजीं निर्दोष म्हणून सोडून दिलें. तथापि यावर सरकारने अपील केलें आणि आणखी वरच्या कोर्टाने २१ मार्च १९४० रोजीं निकाल दिला. या कोर्टाचें मत असें पडलें की कायद्याचा सरळ अर्थ केल्यास वैद्यकीय कारणांकरतां देखील डाक्तरांनी संततिनियमनाचा सल्ला देणें हा गुन्हा आहे. यांत संशयाला मुळीच जागा नाही, आणि त्यांत डाक्तरांचा मुद्दामच अपवाद केलेला नाही. त्यांत कोणाचाहि अपवाद केलेला नाही आणि डाक्तरांचा

अपवाद करण्याचे आजपर्यंत अनेक प्रयत्न झाले असूनहि ज्या अर्थी ते यशस्वी झालेले नाहीत, त्या अर्थी न्यायाधिशांनी त्याचा अर्थ करतांना केवळ आपल्याला बरें वाटतें म्हणून त्यांत अपवाद करतां नये. तथापि या कोर्टानें असेंहि मत दिलें की जेथे स्त्रीच्या जिवाला धोका असेल तेथें अपवाद करायचा की नाही, हा प्रश्न येथे उपस्थित झालेला नाही. फक्त आरोग्याकरतां संततिनियमनाचा सल्ला देणें हा मात्र अपवाद होऊं शकत नाही, इतकेंच मत कोर्टानें दिलें. लोकांच्या आरोग्याची आणि नीतीची काळजी घेण्याचा हक्क संस्थानच्या सरकारला आहे आणि त्याकरतांच हा कायदा केलेला आहे. आरोपीतर्फे असेंहि सांगण्यांत आलें की आपणास मुलें किती असावीं हें ठरवण्याचा हक्क प्रत्येक व्यक्तीला आहे, आणि तीं नको असतील तेव्हा संततिनियमन करण्याचा हक्क त्याचबरोबर येतो. यावर कोर्टाचें मत असें पडलें की औरस मुलांचे बाबतींत देखील संततिनियमन करणें हें सार्वजनिक हिताविरुद्ध आहे असें मानून हा कायदा केलेला आहे; आणि अशी माहिती देण्यानें नीति बिघडण्याचा देखील संभव आहे. कारण ती जरी केवळ विवाहित स्त्रियांनाच दिली, तरीहि त्यांना कधीहि विवाहबाह्य समागमाचा मोह पडणार नाही असें म्हणतां येणार नाही, आणि अशा वेळीं गर्भधारणेच्या भीतीचा उपयोग नीतिरक्षणाकडे निःसंशय होतो. उदाहरणार्थ गुप्त रोग थोड्या खर्चांत आणि फारसा त्रास न पडतां बरे करतां येतात अशी जाहिरात दिल्यास गुप्त रोगांची भीति रहाणार नाही आणि अनीतीकडे प्रवृत्ति होईल, तशीच ही गोष्ट आहे.

त्यांत असाहि एक मुद्दा निघाला होता की महिन्यांतून अमुक दिवस वर्ज्य केले असतां गर्भधारणा होत नाही अशा समजुतीनें ते दिवस ठरवण्याकरतां एखाद्या कॅलेंडरचा उपयोग करतां येईल; तेव्हा वरील कायद्याप्रमाणे कॅलेंडर हें संततिनियमनाचें उपकरण होतें की काय ? यावर तें तसें होत नाही असें मत कोर्टानें दिलें. शेवटीं कोर्टानें असें सांगितलें की हा कायदा फाजील व्यापक आहे असें ज्यांना वाटत असेल, त्यांनी तो बदलून घेण्याची खटपट करावी, परंतु कोर्टांना त्याचा भलताच अर्थ करतां येणार नाही.

या कोर्टांतील पांच जज्जांपैकी तिघांनी वरील मत दिलें, परंतु बाकीचे दोन त्यांशीं सहमत नव्हते. यानंतर सरकारने हा खटला पुढे चालवला नाही, आणि आपण करतों हें करण्याचा आपला हक्क आहे अशा समजुतीने आरोपींनी गुन्हा केला असल्यामुळे त्यांना फक्त इषारा देऊन सोडून दिलें. तथापि अमेरिका अजून किती मागासलेली आहे हें या खटल्यावरून उत्तम रीतीने सिद्ध होतें.

---

# त्यागाचा त्याग

लेखक, मामा वरेरकर

११ व्या वर्षी तिचें लग्न झालें. १३ व्या वर्षी तिला वैधव्य आलें.

तिचें सासर तिच्या माहेरापासून जवळच होतें. कांही मैलांवर असलेल्या या तिच्या सासरीं तिचा नवरा वारला, त्यावेळीं ती माहेरीं होती. हिंदूंच्या आचाराप्रमाणें जे जे सोपस्कार व्हायचे ते होऊन त्या इवल्याशा पोरीवर वैधव्याचा शिक्का मारण्यांत आला.

काय झालें हें कळण्याइतकें जरी तिचें वय नव्हतें तरी ती मुळची चाणाक्ष असल्यामुळे आपल्या परिस्थितीची तिला कल्पना आली. तिचें माहेर फारसें संपन्न नव्हतें, पण सासर मात्र अगदीं दरिद्रावस्थेंत होतें. यापुढें सासरीं तिला कुणी घेऊन जाईल असें माहेरच्या माणसांना वाटलें नाही.

तिच्या चौदाव्या वर्षी तिचा बाप वारला नि थोड्याच दिवसांत तिची आई तिला घेऊन मुंबईला आपल्या मुलाकडे आली. या तिच्या भावाला मुंबईत एका मुलींच्या शाळेंत मास्तरची नोकरी होती. त्यानें घरींच तिला शिकवलें. पूर्वीचें तुटपुंजे शिक्षण पुरेसें झालें असें दिसून येतांच ती इंग्रजी शाळेंत जाऊं लागली. मुंबईत सुद्धां ही रीत आक्षेपार्ह ठरण्याइतकी त्या वेळची परिस्थिति होती. ब्राह्मणाच्या विधवेनें–त्यांतून इतक्या अल्पवयी विधवेनें–शाळेंत जाण्याचें केलेलें धाडस शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या दृष्टीनें सदोष ठरत असतांही तिच्या भावानें कोणाची पर्वा न करतां तिला शिक्षण द्यायला सुरवात केली.

## त्यागाचा त्याग

एकोणिसाव्या वर्षी ती मॅट्रिक झाली नि कॉलेजांत जाऊं लागली, त्यावेळीं तिची आई वारली. आईची पांखर नाहीशी होतांच तिच्या भावजयीने नवऱ्याच्या दृष्टीआड तिचा छळ करायला सुरवात केली. लोकदृष्ट्या ही तिची भावजय मोठी सात्विक वृत्तीची होती—धर्मशील होती. लोकापवादाचे फूत्कार सहन करणें तिच्या या सात्विक वृत्तीला मानवत नव्हतें, म्हणून तिनें आपल्या नणंदेचा छळ करायला सुरवात केली.

पूर्वीच्या काळांत हा इतिहास घरोघरचा होता. त्यांत विशेष असें कांही नव्हतें. म्हणून त्या छळाचा तिच्या मनावर परिणाम झाला नाही. आजपर्यंत कधीही न करावीं लागलेलीं घरचीं कामें ती करीत असल्याचें पाहून तिच्या भावानें तिला विचारलें तेव्हा ती म्हणाली, 'आई आजवर संसाराचा हा भार संभाळीत होती. वहिनीची प्रकृती नाजूक आहे. मुलाबाळांच्या खस्ता काढणं तिला झेपत नाही. आतां तें आईचं काम मी करायचं नाही तर कुणी ?

'पण त्यामुळं तुला अभ्यास करायला वेळ मिळत नाही ना ? ' तिच्या भावाने विचारलें.

'छे, छे ! ' ती म्हणाली, 'माझा अभ्यास चांगला चाललाय् ! पूर्वी उगीच रिकामा वेळ जात असे तो आतां कामीं लागतोय् !'

भावाचें समाधान झालें. पण तिच्या भावजयीला चीड आली. तिला त्रास व्हावा म्हणून तिनें कामाचा बोजा तिच्यावर टाकला होता. त्रास झाल्याचें लक्षण न दाखवतां सुखासमाधानानें ती हा भार उचलीत आहे असें पाहून तिच्या भावजयीला अत्यंत असमाधान झालें. ती तिला घालून पाडून बोलूं लागली. तिच्या प्रत्येक कामांतल्या चुका दाखवून तिचा पाणउतारा करूं लागली.

तिनें तें सारं सहन केलें. तिची भावजय तिच्यापेक्षां एक दोन वर्षांनींच मोठी होती. तिला एक मुलगा नि एक मुलगी अशीं दोन अपत्यें झालीं होतीं. त्यांचा भार सांभाळायचें आईचें काम ती हौसेनें करीत होती.

त्या हौसेच्या पोटीं वात्सल्याचा उगम झाला. मुलांचा लळा लागतां लागतां स्वत्वाची जाणीव उत्पन्न होऊं लागली. तिच्या भावजयीला तिचा मत्सर

वाटूं लागला. आईला विसरुन मुलें आपल्या आत्याकडे ओढ घेतात हें पाहून ती त्या मुलांचाच द्वेष करूं लागली. मुलांनीं आत्यासाठीं एवढासा ओढा दाखवला तर ती त्यांना मार देऊं लागली.

स्वतःला मारलें असतें तर तिला कांही वाटलें नसतें. पण आपल्यासाठीं त्या मुलांना मार बसतो आहे हें पाहून तिचा जीव तिळतिळ तुटूं लागला. पण त्याला कांहीं उपाय नव्हता. तो सारा छळ निमुटपणें सहन करण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. त्या तसल्याच परिस्थितींत ती आपला कॉलेजचा अभ्यास करीत होती. तिला यातना होत होत्या. मानसिक क्लेशाबरोबरच अभ्यासामुळे पडलेल्या ताणाचा परिणाम होऊन तिचें शरीर खालावत चाललेलें होतें. या शारीरिक दुबळेपणामुळे हळूहळू तिचा मनावरचा ताबा सुटूं लागला नि नणंदाभावजयांत उघड उघड कलह माजूं लागला.

हीं भांडणें तिच्या भावाच्या नजरेसमोर होत नव्हतीं. शाळेच्या वेळाबाहेर त्यानें शिकवण्या पत्करल्या असल्यामुळे त्याचा बराच वेळ घराबाहेर जात असे. त्याचा फायदा घेऊन त्याची बायको नणंदेचा छळ करीत होती.

तो सुधारणेचा काळ होता. रूढाचारावर आघात करून सनातनी लोकांची पर्वा न करतां कांही धीराचे पुरुष नव्या प्रथा अंमलांत आणीत होते. तिचा भाऊ सनातनी नव्हता. सुधारणेचीं सारीं तत्त्वें आपल्या घरीं अंमलांत आणण्याइतकी बायकोच्या वृत्तीमुळे जरी त्याला मोकळीक नव्हती तरीही त्याचे विचार मात्र कर्तबगार सुधारकाला शोभण्यासारखे होते.

त्या वर्षी ती बी. ए. होणार होती. आतां तिचें वय तेवीस वर्षे होतें. त्या काळच्या दृष्टीनें ती जरी प्रौढ बाईच्या सदरांत मोडली जात होती, तरी वैधव्यामुळे टिकून राहिलेल्या बालिशपणाची छाया अजूनही तिच्यावर उठावून दिसत असल्यामुळे तिचें हें वय पाहणाराला खरें वाटत नसे. फार तर ती १७–१८ वर्षांची असेल असेंच कुणीही म्हटलें असतें.

म्हणूनच तिच्या भावाला वाटलें तिच्याकडे पुनर्विवाहाचा प्रस्ताव करून पहावा. त्याला धीर होईना. तिच्या कॉलेजांतल्या एका प्रोफेसरची तिच्याशी

पुनर्विवाह करायची तयारी होती. त्या प्रोफेसरचें यापूर्वी लग्न झालें नव्हतें. फार-तर विधुरानेंच विधवेशीं पुनर्विवाह करावा असें त्यावेळीं समजण्यांत येत असे.

त्या प्रोफेसरनेंच तिच्या भावाच्या डोक्यांत ही कल्पना घातली तेव्हां त्यालाही तसें व्हावें असें वाटूं लागलें.

घरीं या गोष्टीचा प्रस्ताव करणें शक्य नव्हतें. तिच्या भावजयीच्या कानीं ती गोष्ट गेली असती तर तिने एकच आकांत केला असता. बाहेर कुठें विचारावें म्हटलें तर कॉलेजखेरीज ती दुसऱ्या कुठेंच जात नसे. नाटकाला जायच्या वेळीं सारींच बरोबर जात. तिच्या भावाला मोठी पंचाईत पडली. बाहेर नेऊन बोलावें म्हटलें तरीही कठीण गेलें असतें. यामुळें त्याने पत्र लिहून हा प्रस्ताव तिला कळवला.

तिला एकदम धक्का बसला. लग्नाची कल्पना तिच्या डोक्यांत केव्हांच आली नव्हती. भावाच्या मुलांचें लालनपालन करण्यांत तिच्या कौटुंबिकतेच्या उणीवेचा चरितार्थ होत होता.

त्या पत्राने तिला धक्का बसला. दोनच ओळींत तिने उत्तर लिहिलें, ' तें शक्य नाहीं दादा, तुझें घर मला संभाळलें पाहिजे. '

त्या उत्तरानें त्याचें असमाधान वाढलें. बायको हयात असतांना आपलें घर संभाळण्याची जबाबदारी आपल्यावर आहे असें आपल्या बहिणीला कां वाटतें ? तो बारकाईने पाहूं लागला, त्यावेळीं त्याला दिसून आलें कीं, मुलांचा लळा आईला नव्हता. मुलें आईला विसरून आपल्या आत्याच्या गळीं पडलीं होतीं. सुशिक्षित तरुणींकडून असल्या जुन्या काळच्या कौटुंबिक वृत्तीची अपेक्षा त्यावेळीं कोणी करीत नव्हतें, म्हणूनच त्याला तिच्याबद्दल अभिमान वाटला खरा, पण स्वतःचा संसार थाटून सुखी होणें शक्य असतांही ती आपल्या मुलांसाठीं स्वार्थ-त्याग करते आहे हें पाहून त्याचें हृदय भरून आलें.

आपल्या बायकोकडे शेवटीं एकदां त्याने या रहस्याचा स्फोट केला. तिने त्याला नाही नाही तें बोलून जेव्हा छेडलें तेव्हा दोघींच्या तुलनेने त्याला

बहिणीची योग्यता मोठी वाटूं लागली, नि म्हणूनच तिला स्वतःचा संसार थाटतां यावा यासाठीं त्याचा जीव तळमळूं लागला.

ती बी. ए. झाली. त्याच शाळेंत तिला नोकरी मिळाली. बहिणभाऊ मिळवते झाल्यामुळें संसार सुखाचा होऊं लागला. घरांत मुलांची संख्या वाढत होती, पण त्यांच्या संगोपनाचा भार तिच्यावरच पडत होता.

अशींच कांहीं वर्षे गेलीं. वाढत्या कुटुंबाबरोबर दोघांच्या उत्पन्नांतहि वाढ होत असल्यामुळें कोणालाच कष्ट जाणवत नव्हते. पण तिच्या भावजयीला मात्र त्याबद्दल कांहीच वाटत नव्हतें. ती म्हणे, " काय झालं केलं म्हणून ? आज कुठंतरी खेड्यांत उष्टीं खरकटीं करीत मेली असती—कदाचित् पोळपाट लाटणं हातांत घेऊन कुणाच्या तरी घरीं सैंपाकीण म्हणून राहिली असती, ती आतां बडी मास्तरीण म्हणून मिरवतेय ती कुणामुळं ? '

या उद्गारांचें तिला कांही वाटत नसे. वस्तुस्थितीच तशी होती. पण वाईट वाटे तिच्या भावाला. ती घरांतून जाऊन स्वतंत्र राहिली असती किंवा तिनें पुनर्विवाह केला असता तर आज तिची सर्वपरीनें जी मदत होत होती ती कशी झाली असती ! हा तिचा स्वार्थत्याग होता असेंच त्याला वाटे, म्हणून बायकोने कांहीही म्हटलें तरी तो तिकडे लक्ष देत नसे.

याचीच त्याच्या बायकोला चीड येई. आतां तिने उघड उघड तिला त्रास द्यायला सुरवात केली होती. तो पहात होता, पण त्याचें कांही चालत नव्हतें. भावजयीच्या या दुष्टाव्याबद्दल तिला मात्र कांहीच वाटत नव्हतें.

एके दिवशीं टायफॉइड होऊन त्याने देह ठेवला. दोघीही अनाथ झाल्या. कुटुंबाचा सारा भार आतां जरी तिच्यावर पडला होता तरी तिच्या भावजयीने मात्र आपली मूळची वृत्ति सोडली नव्हती. पुनर्विवाहाचा प्रस्ताव करणारा तो प्रोफेसर अजूनही अविवाहित होता. त्यानें या प्रसंगानंतर तिची गांठ घेऊन पुन्हां एकदां तोच प्रस्ताव केला, तेव्हा ती म्हणाली, ' आतां तें शक्यच नाहीं. भावाचं ऋण फेडण्यासाठीं तरी मला असंच राहिलं पाहिजे ! '

'तसं कशाला ?' प्रोफेसर म्हणाला, 'आपण लग्न केलं म्हणजे कांहीं यांना टाकलं पाहिजे असं होत नाहीं ? हींही राहतील आपल्याकडेच !'

पण तें तिला पटलें नाहीं. ती म्हणाली, 'तसं झालं तर परक्याच्या जीवावर जगतों आह्मीं असें त्यांना वाटेल. आज मी त्यांच्यांतलींच एक आहे— तसं झालं तर तो आपलेपणा राहणार नाहीं.'

निराश होऊन प्रोफेसर निघून गेला. अशींच आणखी कांहीं वर्षें गेलीं. मुलें जसजशीं मोठीं होऊं लागलीं तसतशीं ती आपल्या आईकडे ओढा दाखवूं लागलीं. मुलांचें मन कलुषित करण्याचा तिच्या भावजयींचा प्रयत्न हळूहळू यशस्वी होऊं लागला.

मुलें आपल्यापासून दुरावत आहेत असें पाहून तिला दुःख होऊं लागलें. पण दिवसेंदिवस आईच्या नादीं लागून मुलें तिचा छळ करूं लागलीं होतीं. तो प्रोफेसर मधून मधून येऊन भेटत असे. त्या भेटीचा विपर्यास करून प्रत्यक्ष तीं मुलें जेव्हा तिची निंदा करूं लागलीं तेव्हा मात्र तिच्या हृदयाने ठाव सोडला. त्या मुलांसाठींच तिने स्वार्थत्याग केला होता. त्या मुलांसाठींच ती अविवाहित राहिली होती. त्या मुलांनीच आपल्याला नावें ठेवावीं हें तिला सहन झालें नाही.

पण तिला कांहीच बोलतां येत नव्हतें. इतकीं वर्षें क्लेश सहन करून तिने मनाची जी वृत्ति बनवली होती ती अशा कृतघ्नतेमुळे सुद्धा सोडून देणें तिला शक्य नव्हतें. सहनशीलता आतां तिला स्वभावसिद्ध झाली होती. त्या सहनशीलतेमुळे त्या छळाची वाढती कळा तिला दुःसह वाटत नव्हती.

मुलें शिकूं लागलीं होतीं, कर्तासवरतीं होण्याच्या मर्यादेवर आलीं होतीं, तरीही तिनें त्यांना टाकून दूर होण्याची कल्पना मनांत सुद्धां आणली नाही. अजूनही प्रोफेसर अविवाहितच होते.

× × × ×

कालाची मजल जोराने सुरू होऊं लागली. दुसऱ्यासाठीं राबण्यापलीकडे आपण आयुष्यांत कांहीच केलें नाही याची जाणीव तिला डाचूं लागली. आतां

तिचा मोठा भाचा स्वतः मिळवता झाला होता. तिने त्याचें लग्न करून दिलें. सासूच्या शिकवणीने सूनसुद्धां तिच्यावर उलटून पडूं लागली.

एके दिवशीं तिच्या भाच्याने आपली आई, बायको नि भावंडें घेऊन निराळें बिऱ्हाड केलें. एकलकोंडेपणा येऊं नये एवढ्यासाठीं जन्मभर तिनें ज्या खस्ता खाल्या, जो छळ सहन केला, जो स्वार्थत्याग केला, जें आत्मसंयमन केलें, तें सारें फुकट गेलें. वार्धक्याच्या सीमेवर आतां ती येऊन उभी राहिली होती. प्रोफेसरने यावेळीं पुन्हा तो प्रस्ताव केला. पण मनांत येत असूनही हट्टाने तिने त्याला नकार दिला.

एकलकोंडेपणा तिला दुःसह होत होता. आपलें असें म्हणायला आतां कोणींच राहिलें नव्हतें. आजवर ज्यांच्यासाठी तिनें एवढ्या खस्ता खाल्या तीं भावाचीं मुलेंच तिच्यावर भलभलते आरोप घेऊन बाहेर तिची निंदा करीत होतीं. तिच्या काल्पनिक अनीतीचे पुरावे सांगत तीं सारीं माणसें जगाचें मन आपल्याबद्दल कलुषित करीत फिरत आहेत असें पाहून तिला माणसाच्या जातीची चीड येऊं लागली. तिला वाटलें माणसाच्या कृतघ्नतेची मर्यादा असते तरी कुठवर ?

ती आतां वृद्ध झाली होती. शाळेची नोकरी करीत असतांना तिला पूर्वीचा उत्साह वाटत नव्हता. तिचा स्वभाव त्रासिक नि चिरचिरा झाल्यामुळे पूर्वीची लोकप्रियताही ती दिवसेंदिवस गमावून बसूं लागली होती.

तिने सिंहावलोकन करून पाहिलें. उत्तर वयांत आपल्या मनोभावनेचा अधःपात होत आहे असें तिला वाटलें. आजवर आत्मसंयमनाच्या उज्ज्वल नांवाखाली बळेंच दाबून टाकलेल्या मानवी भावना आतां तिला भंडावून सोडूं लागल्या. वार्धक्याच्या कालांत तारुण्यसुलभ भावना तिला बळेंच आणलेल्या त्यागी वृत्तीच्या कैफापासून जागृत करूं लागल्या.

आतां तिचा तिलाच राग येऊं लागला—पश्चात्ताप होऊं लागला. काय या त्यागाचें फल मिळालें ? कोण सुखी झालें या त्यागामुळे ? कौटुंबिक वृत्तीचा चरितार्थ होणें आतां यापुढें अशक्य होतें खरें, पण त्याच वृत्तीची अनावर

भावना या अतिपरिपक्व कालांत तिला हरपलेल्या तारुण्याची जाणीव देऊं लागली. तिला वाटे हें मनांतलें दुःख कुणाजवळ बोलूं ? कोण माझें सांत्वन करील ? कोणाच्या शब्दांच्या कुरवाळणीनें आपला संतापलेला मेंदु शांत होईल ?

ती वृद्ध झाली होती—पुन्हां पुन्हां ती आरशांत पाही, त्यावेळीं हरवलेल्या तारुण्याच्या जाणिवेने तिचा जीव कासावीस होई. भाऊभावजयीचे–कौटुंबिकच कां होईना—पण प्रेमप्रसंग पहातांना तिने पूर्वी डोळेझांक केली होती. त्या मनाच्या सांधीकोंपऱ्यांत अडगळीसारख्या पडून राहिलेल्या आठवणी या एकलेपणाच्या वेळीं जुना केर झाडून काढीत असतांना तिच्या हातीं लागूं लागल्या. त्या आठवणीमुळे तिला आपल्या प्रत्ययाला येत असलेल्या वार्धक्याची विस्मृति होऊं लागली. कुणींतरी आपल्याला जवळ घ्यावें, आपल्याला कुरवाळावें, गळ्यांत हात टाकावा, ओंठाला ओंठ द्यावे, असल्या अप्रस्तुत कल्पना तिच्या मनांत उभ्या राहून तिला भंडावून सोडूं लागल्या.

\+ + + +

फार दिवस तिला प्रोफेसरचा पत्ता नव्हता. सेवानिवृत्त होऊन ते कुठेंतरी खेड्यांत जाऊन राहिले होते.

तिनें त्यांचा तपास सुरू केला. पत्ता लागतांच ती त्या गांवीं गेली.

ती आलेली पहातांच प्रोफेसरचा आनंद गगनांत मावेना. ती कां आली होती याची त्यांना कल्पना नव्हती. पण ती आली एवढ्यानेच त्यांना कृत-कृत्यता वाटली. एकलेपणाची दुर्धर जाणीव त्यांनाही डांचत होती. हरवलेलें तारुण्य पुन्हां शोधून काढायची कल्पना त्यांच्या मनांत सुद्धा येत नव्हती–असह्य झाली होती. काय ती एकलेपणाची आग! सहवासाचा अभाव!–वार्धक्यांत अवश्य वाटणाऱ्या–अत्यंत आवश्यक असलेल्या अशा आपल्याच सारख्या एखाद्या वृद्ध सहचरीच्या सहवासाच्या अभावीं त्यांना इतर दृष्टींनी समृद्ध असलेलें जीवन भकास वाटत होतें.

\+ + + +

महाराष्ट्रांतील वर्तमानपत्रांत ती बातमी येतांच एकच खळबळ उडाली.

वैधव्याचे आजन्म कष्ट सहन करीत, शिक्षणाच्या कार्याला सर्वस्वी वाहून घेत-लेल्या एका अत्यंत लोकप्रिय वृद्ध शिक्षकिणीने पन्नासाव्या वर्षी पुनर्विवाह करून जन्माच्या तपश्चर्येवर पाणी ओतलें म्हणून जो तो छी थू करूं लागला.

पण ती मात्र सुखी झाली होती. तिच्या भावाच्या विधवेने नि मुलांनी वाढत्या उत्साहाने चालवलेली तिची निंदा ऐकून सुद्धा तिला कौतुक वाटत होतें. जगाकडे पाहण्याची तिची दृष्टि बदलल्यामुळे त्यांच्या कृतघ्नतेबद्दल ती आता मुळीच उद्विग्न होत नव्हती.

सहवासाच्या सुखांत तारुण्याच्या प्रणयचेष्टा नव्हत्या खऱ्या, पण जन्माची उणीव आतां भरून निघाली असें तिला वाटलें.

---

# ग्रंथपरीक्षण

**१. गांधीवाद,** पुस्तक चौथें, पुरोगामी विचारमाला, न्यू इतवारी रोड, नागपूर, पृष्ठें ६७, किंमत ६ आणे.

गांधींच्या कृतींवरून आणि लेखांवरून त्यांचें एकंदरींत म्हणणें तरी काय आहे याचें पुष्कळांना कोडेंच पडतें. तें उकलण्याचा या पुस्तकांत केलेला प्रयत्न चांगला साधला आहे. त्यांत प्रथम गांधींच्या राजकीय चळवळींची ऐतिहासिक माहिती देऊन नंतर सत्य, अहिंसा, सत्याग्रह, खादी, रामराज्य, कामगार-संघटना, साम्यवाद, वसाहतींचें स्वराज्य, संपूर्ण स्वातंत्र्य, वगैरे विषयांवरील त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. पुस्तकांत अशुद्धें अगणित आहेत व भाषाहि मोठीशी चांगली नाही, तथापि पुस्तकाचा उद्देश सफल झाला आहे यांत शंका नाही. लेखकाचें नांव दिलेलें नसलें तरी तें एखाद्या समाजवाद्याने लिहिलेलें असलें पाहिजे हें उघड दिसतें. तथापि त्याने गांधींची भूमिका प्रामाणिकपणें त्यांच्याच लिखाणाच्या आधाराने दाखवली आहे.

गांधींचें सत्य म्हणजे त्यांचा ' आंतला आवाज, ' लोक ज्याला सत्य

म्हणतात त्याशीं त्याचा बिलकुल संबंध नाही. सत्य म्हणजेच परमेश्वर, म्हणजे आंतला आवाज. उपोषण केव्हां आणि किती दिवस करायचें, हें आंतला आवाजच सांगतो. ( पृ. १४ ). यामुळे गांधी म्हणतील तें सत्य, असेंच त्यांच्या अनुयायांना तरी मानावें लागतें. अहिंसेसंबंधी देखील हीच स्थिति आहे. गांधींच्या मताप्रमाणे आळस ही एक प्रकारची हिंसा आहे. " त्याचप्रमाणे स्वादाकरतां जेवणें हें सुद्धां अहिंसेच्या विरुद्ध आहे " ( पृ. २२ ). प्राणिजीवन हें हिंसामय आहे याची त्यांना नीट जाणीव आहे. एका ठिकाणीं ते म्हणतात, ' मनुष्य प्रत्येक श्वासाबरोबर हिंसा करतो. ' तेव्हा कमींत कमी हिंसा करणें म्हणजेच अहिंसा असें त्यांचें म्हणणें आहे.

यंत्रांना एके काळीं त्यांचा पूर्ण विरोध होता, परंतु आतां ते केवळ प्राथमिक स्वरूपाच्या गरजा भागवणाऱ्या यंत्राना संमति देतात. यामुळे चरखा हें यंत्र असलें तरी तें चालतें. ' परंतु मोटारगाडी हें अनवश्यक यंत्र ठरतें ' ( पृ. ३५–३६ ). तरी गांधी त्याचा उपयोग करतातच, कारण ते संपूर्णतेला पोंचलेले नाहीत. खादीसंबंधी यांत दिलेले आंकडे उद्‌बोधक आहेत. नागपूर शहरांत १९२४ सालीं कांग्रेस सभासदांची संख्या ११९३ होती, परंतु खादीची अट घातल्यावर ती पुढच्या वर्षी ५९ वर आली ! खादीप्रचाराकरतां आजपर्यंत कोट्यवधि रुपये खर्च झाले आहेत. परंतु पाण्यासारखे पैसे ओतून आणि वीस वर्षे आटोकाट प्रयत्न करून देखील आज हिंदुस्थानांत खपणाऱ्या कापडाच्या फक्त एक साठांश इतकीच खादीची उत्पत्ति आहे. सुमारें दोन लाख मजूर खादीवर उपजीविका करतात. त्यांना प्रत्येकीं सालीना रु. ९ मिळतात. परंतु बेकारीमुळे इतरत्र तेही मिळत नसल्यामुळेच लोक हा धंदा करतात. अशा रीतीने बेकारीचा प्रश्न सोडवूं पाहणें हास्यास्पद आहे. ( पृ. ३९–४० ).

गांधी म्हणतात, ' दारिद्र्याचा संपूर्ण लोप कोणत्याहि काळीं नव्हता व यापुढेहि तो संभवत नाही ' ( पृ. ४१ ). गांधींना कल्पनाशक्ति आणि दूरदृष्टि नाही इतकेंच यावरून दिसतें.

ब्रिटिश साम्राज्याबद्दल त्यांना अत्यंत प्रेम असल्यामुळे वसाहतींच्या

स्वराज्यापलीकडे त्यांची दृष्टिच गेली नव्हती आणि संपूर्ण स्वराज्याची कल्पना त्यांच्यावर इतरांनी लादलेली आहे. या साम्राज्यप्रेमामुळेच त्यांनी साम्राज्याला मदत करण्याकरतां रिक्रूटभरतीचें काम अनेक वेळा केलें आहे. या वेळीं त्यांची अहिंसा कोठें गेली होती असें कोणीं विचारल्यास ते वकिली पद्धतीचीं उत्तरें देतात.

लोकशाही हें त्यांचें ध्येयच नव्हे, त्यांचें ध्येय रामराज्य. ' स्वराज्य-विषयक आपलें अंतिम ध्येय सिद्ध झाल्यास प्रतिनिधि, निवडणुकी, इत्यादींचे नांवनिशाण देखील राहणार नाहीं ' ( पृ. ४७ ) कामगारांचे बाबतींत ते नेहमीच गिरणीमालकांच्या बाजूचे असतात. त्याचप्रमाणे हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर देखील संस्थानें पाहिजेतच असेंहि ते सांगतात. ( पृ. ३०,४४ )

एकंदरींत गांधीवादाने आजपर्यंत कितीहि उपयुक्त लोकजागृति झाली असली, तरी लोकशाही हेंहि त्यांचें ध्येय नसल्यामुळे आतां गांधीवादाची पीछे-हाटच होत आहे आणि ती तशीच चालू राहणार, असा या पुस्तकाचा निष्कर्ष आहे.

र. धों. कर्वे.

**२. समाजसत्तावाद.** लेखक फ्रीड्रिक एंगेल्स, भाषांतरकार द. ल. जयवंत, प्रकाशक पी. डी. मराठे, पुरोगामी विचारमाला, महाल, नागपूर, पृ. १३१. किंमत १ रु.

कार्ल मार्क्स याचा मित्र व शिष्य एंगेल्स याने १८८० सालीं जर्मनमध्ये हें पुस्तक लिहिलें. मराठी भाषांतर चांगलें आहे. इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी या तिन्ही देशांतील राजकीय व धार्मिक क्रांत्यांचा सविस्तर इतिहास या पुस्तकांत दिला आहे व त्यापासून समाजसत्तावाद हळूहळू कसा अस्तित्वांत आला हें संगतवार दाखवलें आहे. परंतु हा वाद अजूनहि बारंवार ढासळणाऱ्या प्रयोगावस्थेंतच आहे असें म्हटल्यावांचून राहवत नाही. पुस्तकांत पुष्कळ टीपा दिल्या आहेत आणि शेवटीं एक सूची दिली आहे. या वादावर विश्वास नसला तरीहि हें पुस्तक वाचल्याने फायदाच होईल.

शकुंतला परांजपे.

# सुप्रजाजनन

——:०:——

गेल्या वर्षी आगस्ट महिन्यांत जननशास्त्राची सातवी आंतरराष्ट्रीय परिषद् एडिंबरो येथे भरली होती. या शास्त्राच्या दृष्टीने सर्व जगांतील लोकांची सुधारणा करण्याचे सर्वांत यशस्वी उपाय कोणते होतील ? असा तेथे जमलेल्या जीवशास्त्रज्ञांस प्रश्न केला असतां त्यांपैकी कांहींनी पुढील उत्तर दिलें. या उत्तरावर डॉ. क्र्यू, प्रो. जे. बी. एस. हालडेन, प्रो. हॉगबेन्, प्रो. जूलियन हक्स्ले, वगैरे विद्वानांच्या सह्या आहेत. यावर परिषदेंत चर्चा झालेली नाही, परंतु इतक्या विद्वानांचें मत या दृष्टीने त्याला किंमत आहे. त्याचा सारांश पुढे दिला आहे.

हा केवळ जीवशास्त्राचा प्रश्न नाही, आणि यांत अनेक बाबी विचारांत घ्याव्या लागतात. कारण मानवजातीची सुधारणा सामाजिक परिस्थितीवर आणि तदनुषंगिक मनःप्रवृत्तींवर अवलंबते. पहिली गोष्ट अशी की समाजांत सर्वांना स्वोन्नतीची सारखी संधि मिळेल अशी सामाजिक आणि आर्थिक परिस्थिति जोंपर्यंत नाही, आणि जन्मापासूनच जोंपर्यंत माणसांचें वर्गीकरण करून त्यांना वेगवेगळे हक्क दिले जातात, तोंपर्यंत व्यक्तीची किंमत तुलनेने ठरवणें अशक्य आहे. सुधारणेला आणखी एक अडथळा म्हणजे वेगवेगळया गटांत आणि राष्ट्रांत वैरभाव उत्पन्न करणारी आर्थिक आणि राजकीय परिस्थिति. अमुक आनुवंशिक गुण मानवजातीच्या अमुक वर्गांत असतात, किंवा अमुक प्रकारच्या चेहऱ्याशीं त्यांचा कांही संबंध असतो, हें खोटें अशास्त्रीय मत नाहीसें करायचें म्हणजे अगोदर युद्ध किंवा आर्थिक जुलूम अशक्य झाला पाहिजे. याकरतां जगांतील सर्व राष्ट्रांत एकी उत्पन्न झाली पाहिजे आणि जगांतील सर्व लोकांचें हित हा त्या एकीचा पाया असला पाहिजे,

आणखी एक गोष्ट अशी की पुढील पिढी चांगली व्हावी इकडे नजर ठेवून आईबापांनी प्रजोत्पत्ति करावी अशी इच्छा असेल, तर त्यांना आर्थिक, वैद्यकीय,

शैक्षणिक वगैरे सर्व प्रकारची मदत अशा रीतीने केली पाहिजे की मुलें अधिक होण्याने आईवर किंवा बापावर फाजील बोजा पडतां नये. मुलें होण्याने किंवा तीं वाढवावीं लागल्याने आईच्या सामाजिक जीवनांत विशेष व्यत्यय येऊं नये या दृष्टीने तिला विशेष सवलती दिल्या पाहिजेत. हें करायचें म्हणजे उपयुक्त पदार्थांची उत्पत्ति मुख्यतः गिऱ्हाईकांच्या आणि कामगारांच्या फायद्याकरतांच झाली पाहिजे. कामाच्या अटी ठरवतांना आईबापांच्या, आणि विशेषतः आयांच्या, गरजांकडे लक्ष पुरवलें पाहिजे. घरांची आणि एकंदर सामाजिक सुखसोयींची व्यवस्था मुलांच्या हिताच्या दृष्टीने केली पाहिजे.

जननसुधारणेला जरूर असणारी चौथी गोष्ट म्हणजे कायद्यांत जरूर तो फरक करून संततिनियमनाच्या अधिकाधिक यशस्वी साधनांचा शोध होईल तसतशी त्यांची माहिती सर्व जगांत पसरली पाहिजे, आणि जरूर तर तात्पुरतें किंवा कायमचें वंध्यत्व आणतां आलें पाहिजे, आणि संततिनियमनाचे उपाय फसल्यास गर्भपात करतां आला पाहिजे, किंवा कृत्रिम रीतीने गर्भधारणेचीहि सोय पाहिजे. याबरोबरच आईबापांत पुढील पिढीबद्दल जबाबदारीची जाणीव उत्पन्न झाली पाहिजे. परंतु वर सांगितलेली आर्थिक आणि सामाजिक परिस्थिति प्रथम उत्पन्न होईल तरच हें शक्य आहे. शिवाय स्त्रीपुरुषसंबंधाविषयी आजची वेडगळ धार्मिक दृष्टि जाऊन त्याऐवजी शास्त्रीय दृष्टि आली पाहिजे. म्हणजे मग माता विवाहित असो की अविवाहित असो, जरूर तितकीं उत्तम प्रतीचीं मुलें उत्पन्न करणें हें आपलें उच्च कर्तव्य आणि अधिकार आहे, ही जाणीव आईच्या किंवा दंपतींच्या मनांत राहील आणि त्याकरतां प्रजोत्पत्तीच्या नैसर्गिक घटनेचें कृत्रिम रीतीने नियमन करावें लागलें तरी त्याचें त्यांना कांही वाटणार नाही.

परंतु लोकांनी किंवा राष्ट्रांनी या बाबतींत समंजसपणाने वागावें अशी इच्छा असेल तर त्यापूर्वी जीवशास्त्राचें ज्ञान सर्वत्र पसरलें पाहिजे, आणि लोकांना हें कळूं लागलें पाहिजे की मनुष्याची प्रगति आनुवंशिक कारणांप्रमाणेंच परिस्थितीवरहि अवलंबते. या दोन्ही गोष्टी कांही अंशीं परस्परांवर अवलंबतात

आणि दोहोंतहि मनुष्याला प्रयत्नाने सुधारणा करतां येईल. परिस्थिति सुधारल्यास वर सांगितल्याप्रमाणे आनुवंशिक गुण सुधारण्याची व्यवस्था करतां येईल. परंतु केवळ परिस्थिति बदलल्यामुळे आपोआप मात्र पुढील पिढी अधिक चांगली होणार नाही, कारण बदललेल्या परिस्थितीचा परिणाम पुंबीजांवर किंवा स्त्रीबीजांवर होत नाहीं. पुढील पिढी चांगली व्हायला पाहिजे असेल तर जननाचे बाबतींत कांहीतरी निवड झाली पाहिजे. म्हणजे या पिढींत ज्यांच्या अंगांत आनुवंशिक गुण अधिक चांगले असतील, त्यांना अधिक प्रमाणांत संतति झाली पाहिजे, आणि बाकीच्यांना कमी प्रमाणांत झाली पाहिजे. हें परिस्थितीमुळे आपोआप होणें शक्य आहे, किंवा बुद्धिपुरःसर निवड करूनहि करतां येईल. सुधारलेल्या समाजांत अशी निवड आपोआप होण्याचा संभव कमी, तेव्हा ही निवड बुद्धिपुरःसर करणें जरूर आहे. परंतु ती करण्याकरतां लोकांच्या मनांत वरील तत्त्वें चांगलीं बिंबलीं पाहिजेत.

ही निवड सामाजिक दृष्टीने झाली पाहिजे, म्हणजे लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीने झाली पाहिजे. पण ती तशी व्हायची म्हणजे लोकांना सामाजिक दृष्टि आली पाहिजे, आणि त्या तत्वांवर समाजाची घटना झाली पाहिजे. लोकहिताच्या दृष्टीने मनुष्यांत कोणते गुण असणें इष्ट आहे? आमचे मतें (१) आरोग्य, (२) बुद्धि, आणि (३) वैयक्तिक यशाला हल्ली जी फाजील किंमत मिळते ती न मिळतां समाजोपयोगी प्रवृत्तींना अधिक महत्व दिलें पाहिजे.

जीवशास्त्राचे नियम जसजसे अधिक कळूं लागतील, तसतसें लोकांच्या ध्यानांत येईल कीं आपल्याला लोकांची अधोगति होऊं नये इतकेंच पहायचें नसून उन्नति साधायची आहे. म्हणजे हल्ली ज्या कांही थोड्या लोकांत वर सांगितलेले महत्वाचे गुण उच्चतम प्रमाणांत सांपडतात, तें प्रमाण सार्वत्रिक झालें पाहिजे, आणि हें ध्येय थोड्याशा पिढ्यांत साध्य होण्यासारखें आहे. म्हणजे मग अत्यंत बुद्धिमान असणें हा प्रत्येक मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क होईल आणि अर्थातच अशा रीतीने होणाऱ्या प्रगतीला कोणतीहि मर्यादा राहणार नाही.

याकरतां वैद्यक, मानसशास्त्र, रसायनशास्त्र, आणि विशेषतः समाजशास्त्र

या सर्वांना एकमेकांशीं सहकार्य करावें लागेल आणि मनुष्याची प्रगति हें एकच ध्येय सर्वांना डोळ्यांसमोर बाळगावें लागेल. मनुष्याचें शरीर हा अतिशय गुंतागुंतीचा विषय आहे आणि या विषयांत फार मोठ्या प्रमाणावर संशोधनाला जागा आहे. अशा संशोधनाला अजून सुरवात देखील झालेली नाही, परंतु ती व्हायची म्हणजे परस्परांतील द्वेष, युद्ध आणि अन्नाकरतां धडपड नाहीशी होऊन यापेक्षा उच्च ध्येयाकरतां एकजुटीने प्रयत्न झाला पाहिजे.

असा प्रयत्न होण्यासारखी परिस्थिति आज नाही. परंतु या दृष्टीने आर्थिक योजना अंमलांत आणणें, किंवा निदान तयार करणें, हें या पिढीचें काम आहे. ती अंमलांत आल्यावर क्षुल्लक कारणांवरून भांडत बसावें लागणार नाही, आणि आजपर्यंत कोणाच्या स्वप्नांतहि न आलेली प्रगति मनुष्याला शक्य होईल.

# पत्रव्यवहार

आपल्या निर्भीड मासिकाच्या 'पत्रव्यवहार' या सदराने त्याच्या लोकप्रियतेंत भर टाकली यांत शंका नाही. आपण दिलेलीं सडेतोड नि बहुमोल उत्तरें प्रश्न विचारणारांचें समाधान तर करतातच, पण त्याचबरोबर असंख्य वाचकांना अमोलिक फायदा करून देतात. असो. माझी करुण कहाणी फारच विचित्र आहे. आपणांला ती थोडक्यांत निवेदन करतों. माझें वय पंचवीस असून माझ्या पत्नीचें वय अठरा आहे. नुकताच आम्हाला मुलगा झाला आहे. पण दोघांच्या शरीरप्रकृतीकडे पहावं तर जमीनअस्मानाचं अंतर. मी अति उष्ण प्रकृतीचा असल्यामुळे कामवासनेने पीडित होतों, तर उलट पत्नी अति थंड प्रकृतीची असल्यामुळे विषयाबद्दल पूर्ण तिटकारा दाखवते. आमचा मधुचंद्र होऊंच नये म्हणून तिने त्या वेळीं फारच विपरीत अन् शोकजनक प्रकार केले. ती असेंही म्हणावयास तयार आहे—नाही म्हणते सुद्धां-की पुरुषाचा संपर्क नसेल त्या ठिकाणीं मी मोठ्या आनंदानं राहण्यास तयार होईन. मी लैंगिक

विषयाचा बराच अभ्यास केला असलेमुळें प्रत्यक्ष संभोगापूर्वीचे प्रेमविहारहि यथासांग पार पाडीत असतों, पण इतकें करून सुद्धां ती विषयसुखाला स्वेच्छेने कधींच तयार होत नाही. याला मंदप्रकृतिच म्हणावी का ? संभोगपूर्व प्रेमक्रीडे-मध्यें मी यत्किंचितहि कसूर ठेवीत नाही हें मात्र नक्कीच. असं असतांना मी रागावेन म्हणून ती केवळ माझ्यासाठी उद्युक्त होते. लैंगिक सुखांत हे असे परस्परविरोधी दोन ध्रुव असल्यामुळे आम्हा दोघांत एकसारखा बेबनाव चालू असतो. हें मंदप्रकृतीचंच लक्षण असावं असं मला नक्की वाटतं. मग संतति कां व्हावी ? आम्हा दोघांचा असा हरघडी चाललेला बेबनाव पाहून या सुखाबद्दल तीव्र उदासीनता येते व संसारसुखाची इतिश्रीच झाली असें वाटूं लागतें. हा संसाराचा झालेला खेळखंडोबा दुसऱ्यांना धड सांगताही पण येत नाही व यदाकदाचित् सांगितलाच तर त्यापासून समाधानहि पण होत नाही. मोठ्या नामुष्कीची गोष्ट ती ही कीं लग्न झाल्यापासून अद्यापपावेतों मला पूर्ण समाधानाची एक रात्रही ( अक्षरशः ) गेली नाही. आणि प्रत्युत्तर मिळाल्या-शिवाय समाधान तरी कसें मिळणार ?

सन्माननीय संपादक महाशय, दुसऱ्यांचीं दुःखें, अंशतः कां होईना, दूर करण्याची महान कामगिरी आपण आपल्या शिरावर घेतली आहे, याबद्दल कोणीहि आपल्याला अखेरपर्यंत दुवा देत रहाणारच. या आपत्तींतून ( हो ! मी याला आपत्तीच समजतों ) आपण मला मुक्त कराल असा खात्रीने भरवंसा वाटतो. नाहीतर संसाराच्या उदासीनतेंत अन् हृदयाच्या भग्नाशेंतच होरपळून मरण्याचं माझ्यासारख्या कमनशिबाच्या कपाळीं ! आपला कृपाभिलाषी

**व्ही. आर.**

**उ.** या बाबतींत आपणास कांही प्रत्यक्ष मदत करणें शक्य दिसत नाही. पतिपत्नींच्या प्रकृतींतील ही विषमता विवाहापूर्वी प्रत्यक्ष प्रयोगांनी पाहतां येत नाही हा विवाहपद्धतींतील एक प्रमुख दोष आहे. वास्तविक अशा स्त्रियांनी विवाह करून दुसऱ्याच्या आयुष्याचा नाश करतां नये हें खरें, परंतु स्त्रियांच्या बाजूनेंहि असें म्हणतां येईल कीं ज्याचा अनुभवच नाही, तें आपल्याला मानवतें

कीं नाहीं हें त्यांना तरी आगाऊ कसें समजावें ? तेव्हां हा व्यक्तींचा दोष नाहीं, पद्धतीचा आहे. पति रागावेल म्हणून समागमाला कबूल होण्याचा प्रसंग ज्या स्त्रीवर येतो, तिची कींवच केली पाहिजे, आणि विवाहित स्त्रीची स्थिति वेश्यांपेक्षाहि खालची आहे असें आम्ही जें वारंवार म्हणतों, त्याचें कारण हेंच आहे. मग संतति कां व्हावी, हा आपला प्रश्न चुकीचा आहे. कामतृप्तीचा किंवा कामवासनेचा संतति होण्याशीं तादृश संबंध नसतो आणि ज्यांना बिलकूल कामवासना नसते, किंवा असूनहि ज्यांची कामतृप्ति जन्मांत कधींहि होत नाहीं, अशा स्त्रियांना पुष्कळ वेळां विपुल संतति होते. तेव्हां संतति झाली यावरून कांहींच सिद्ध होत नाहीं. आपल्या सनातनी विवाहपद्धतींत पुरुष आपल्यासारख्या अडचणींत सांपडल्यास त्याला अनेक मार्ग मोकळे असतात. वाटल्यास दुसरा विवाह करतां येतो—अर्थात् दोन बायकांचा खर्च चालवावा लागतो—किंवा हल्ली जरी कुणबिणींची पद्धत नष्टप्राय झाली आहे, तरी रखेल्या आणि वेश्या नाहीशा झालेल्या नाहींत. यांतला कोणाला कोणता मार्ग पटेल हा प्रश्न वेगळा, परंतु मार्ग आहेत. स्त्रिया मात्र अशा अडचणींत सांपडल्यास त्यांना व्यभिचार एवढाच चोरटा मार्ग असतो, परंतु त्याला समाजाची संमति नाहीं. पुरुषांचा मार्ग अधिक मोकळा असतो. अर्थात् अशा वेळीं रोगसंसर्गासंबंधी काळजी घ्यावी लागते. मंदप्रकृतीची स्त्री समंजस असल्यास ती पतीला या बाबतींत अडथळा करणार नाहीं, इतकेंच नव्हे तर आपल्यावरचा कठिण प्रसंग टळला म्हणून तिला उलट बरेंच वाटावें. आणि कांहीं कारणानें आपणास समागम शक्य नसल्यास पतीला रखेली ठेवण्याची परवानगी देणाऱ्या स्त्रिया आमचे माहितींत आहेत. परंतु सर्वच स्त्रिया इतक्या समंजस असतात असें मात्र नाहीं. पतीवर आपला मालकी हक्क आहे असें कित्येक स्त्रियांना वाटतें आणि स्वतःला त्याचा उपयोग नसला तरी आपली मालमत्ता दुसऱ्याला वापरूं द्यावी हें त्यांना पटत नाहीं. शिवाय यांत पैशाचाहि प्रश्न असतो. पतीच्या पैशावर सर्वस्वी आपलाच हक्क आहे असेंहि बायकांना वाटतें. तेव्हा त्यांतला कांहीं भाग इतर स्त्रियांवर खर्च झालेला त्यांना पाहवत

नाही. एकंदरींत ज्यांना स्वतःचें पोट भरण्याची ताकद नाही अशा स्त्रिया वेश्या-वृत्तीपासून फारशा दूर नसतात, हें यावरून स्पष्ट होतें. जे दोन शब्द सुचले ते लिहिले. त्यांचा आपणास उपयोग किती होईल हें अर्थातच आम्हास ठरवतां येत नाहीं. **सं.**

# शारदेचें पत्र

मनोहरच्या एका अंकांत वामनराव जोशांनी माडखोलकरांच्या 'दुहेरी जीवन' कादंबरीचें परीक्षण केलें आहे आणि तें सडेतोड असल्याबद्दल 'समीक्षक' मासिकाने त्यांचें अभिनंदन केलें आहे. हें अभिनंदन करण्याचें मुख्य कारण दिलें आहे तें असें की "सामन्यतः जे प्रश्न चांगले असतात त्यांचा पुरस्कार करतांना हे (वामनरावांसारखे) ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यिक जितके पुढें येतात, तितके वाइटाचा निषेध करतांना ते येत नाहीत असें खेदाने म्हणावें लागतें... तशा प्रकारचें कर्तव्य बजावल्याबद्दल प्रो. वा. म. जोशी यांचें अभिनंदन करणें जरूर आहे." प्रश्न वाईट किंवा चांगला कसा असूं शकतो हें कांही मला समजत नाही, आणि कोणत्याही प्रश्नाचा निषेध कां करावा तेंहि मला कळत नाहीं. पण पुढें त्यांनी जे उतारे दिले आहेत त्यांवरून मला असें वाटतें कीं वामनरावांनी टीका कितीहि जपून लिहिली असली तरी 'समीक्षक' कारांनी तिचा भलताच अर्थ केला आहे. वामनराव म्हणतात "या प्रश्नाकडे नैतिक दृष्ट्या पाहाण्याचें मीं टाळतों. किंबहुना नैतिक दृष्ट्या विचार करणें अप्रस्तुत होईल," आणि कादंबरींतलें वर्णन कलात्मक नाही एवढाच त्यांचा आरोप आहे. अर्थात् तेहि शेवटीं थोडेसे घसरलेच आहेत, कारण ते पुढें म्हणतात, "म्हणून प्रेमविषयक वाईट गोष्टींचें वर्णन जें या कादंबरींत आहे तें मला कलात्मक वाटत नाही." कादंबरींतल्या प्रेमविषयक गोष्टींना वाईट म्हणणें हा नैतिक विचारच आहे, कलेच्या दृष्टीने विचार नव्हे. पण वामनरावांची ही केवळ नजरचूक झालेली आहे, मनांत नसतांनाहि नैतिक विचार

त्यांच्या लेखणींतून निसटून गेला. यावरून अशी साहजिक शंका येते की कादंबरींत एका तरुणाचें वेगवेगळ्या स्त्रियांवर प्रेम बसतें व त्यांच्याशीं तो चोरटे संबंध ठेवतो, ही गोष्ट वामनरावांना नैतिक दृष्ट्या वाईट वाटल्यामुळेच त्यांनी या कादंबरीवर शस्त्र उपसलें, पण नैतिक दृष्ट्या टीका करणें बरोबर नाहीं असेंहि वाटत असल्यामुळे त्यांनी आपली टीका कलेवर नेली. अर्थात् वाचकांची फसवणूक करण्यासाठी त्यांनी हें मुद्दाम केलें असें मला म्हणायचें नाहीं, पण त्यांच्या हातून तसें नकळत झालें हें खरें. आणि वामनरावांनी कलेच्या दृष्टीची घोषणा केली असतांहि ' समीक्षक 'कार मात्र त्याचा अर्थ नैतिक दृष्टीनेच करतात, म्हणजे वामनरावांच्या मनांत जें करायचें नव्हतें पण चुकून झालें, त्या चुकीबद्दलच ' समीक्षक ' कार त्यांची पाठ थोपटतात. कारण ते लिहितात, " श्री. माडखोलकरांनी आपल्या ' दुहेरी जीवन ' यांत एका बुद्धिमान तरुणाचें चित्र रेखाटलें आहे. त्या तरुणाचें जीवन दुहेरी होतें हें दाखवण्यासाठी त्याचें दक्षिणी, पारशी, ख्रिश्चन, इत्यादि स्त्रियांवर लागोपाठ प्रेम बसतें, त्यांच्याशीं तो चोरटे प्रेमसंबंध ठेवतो, त्याच्या या चोरट्या प्रेम-संबंधांबद्दल त्याच्या लग्नाच्या बायकोला कांहीं विशेष वाटत नसतें, असें दाखवलें आहे. अलिकडील मराठी कादंबऱ्यांचें अशा प्रकारच्या प्रेमसंबंधांचें दिग्दर्शन हें एक वैशिष्टय होऊं लागलें आहे. जणूं काय, अशा कांहीं रंगेल प्रेम-संबंधाचे रंग न भरलेली कादंबरी महाराष्ट्रीय वाचकांच्या डोळ्यांत भरणार नाहीं अशी या कादंबरीकारांची खात्री झालेली दिसते... या अनिष्ट प्रघाताला आळा घालणें हें जरी या ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यिकांना शक्य नसलें तरी त्याबद्दलची तीव्र नापसंती दाखवणें शक्य आहे, इष्ट आहे; व तें कार्य प्रो. वा. म. जोशी यांनी या परीक्षणाने केलें आहे. " म्हणजे वामनरावांनी जें म्हटलें नाहीं, तें त्यांच्यावर लादून त्याबद्दल ' समीक्षक 'कारांनी त्यांचें अभिनंदन केलें आहे. ' समीक्षक 'कारांना स्वतःला जें काय म्हणायचें असेल तें त्यांनी खुशाल म्हणावें, तें त्यांचें स्वतःचें मत होईल. पण स्वतःचीं मतें वामनरावांवर लादण्याचा हा खटाटोप कां ? याने वाचकांची दिशाभूल मात्र होते. वामनरावांच्या परीक्षणांत

नैतिक छटा चुकून आली आहे, नैतिक दृष्ट्या विचार अप्रस्तुत आहे असें त्यांनी स्पष्ट सांगितलें आहे. तसा विचार 'समीक्षक' कारांना प्रस्तुत वाटत असेल तर तो त्यांनी स्वतःचें मत म्हणून लिहावा, तो 'ज्येष्ठ व श्रेष्ठ' साहित्यिकांवर लादूं नये. वामनराव एकदां नव्हे दहादां सांगतात की मी नैतिक विचार करीत नाही. ते उघडपणें इतकेंच म्हणतात की या कादंबरींतल्या या 'वाईट' प्रेमसंबंधांचें वर्णन कलात्मक नाही. कलात्मक हा शब्द ते भाषासौंदर्याच्या दृष्टीने वापरीत नाहीत हेंहि त्यांनी स्पष्ट केलें आहे. ते म्हणतात, "हे प्रेमसंबंध कां व कसे उत्पन्न होतात याचें मार्मिक दिग्दर्शन असेल......" तरच ती सांगण्यासारखी गोष्ट होईल. एरवीं "कांही तरुण तरुणींच्या प्रेमपाशांत सांपडतात हें सर्वांना विदित असल्यामुळे" ती सांगण्यासारखी गोष्ट नाही. हेंहि मला विशेषसें पटत नाही. वामनराव म्हणतात त्याप्रमाणे 'विशेष सूक्ष्म व मार्मिक निरीक्षण' असेल तर कादंबरी अधिकच खुलेल. मी ती वाचली नाही, पण वामनरावांचें मत मी खरें धरतें. तरीदेखील लोकांना माहीत असलेल्या गोष्टींचीं वर्णनें कादंबरींत येऊं नयेत असें थोडेंच आहे? उत्कृष्ट कादंबऱ्यांतून अशीं वर्णनें काढून देतां येतील, अगदी वामनरावांच्या कादंबऱ्यांतून सुद्धां काढून देतां येतील. मग येथेच वामनराव यावर भर कां देतात? यावरुन मला पुनः एकदां हीच शंका येते की वामनरावांच्या मनांत नैतिक विचार प्रथम आला, आणि त्यामुळें कादंबरीबद्दल वाईट मत होऊन त्या मताचें समर्थन मात्र त्यांनी अशा रीतीने केलें आहे. अर्थात् हें नकळत झालें आहे हें मीं म्हटलेंच आहे. प्रेमसंबंध विवाहावरच आधारलेला असला पाहिजे, ही गोष्ट लोकांच्या डोक्यांत इतकी ठाम बसलेली असते की त्यांच्यावर तिचा नकळत परिणाम होतो. वास्तविक अनेकांवर लागोपाठच काय पण एकाच वेळीं देखील प्रेम असणें शक्य असतें, पण तें कबूल करणारीं माणसें मात्र सांपडणें कठिण. ही वस्तुस्थिति निदान कादंबरींत तरी दाखवण्याचें धैर्य माडखोलकरांनी दाखवलें याबद्दल उलट त्यांचें अभिनंदनच करणें जरूर आहे असें मला वाटतें.

नुकत्याच अंमलांत आलेल्या 'गुमास्ता' कायद्याविषयी 'प्रावीण्य'

मासिकांत एक मुलाखत छापली आहे, तीवरून या कायद्याचे गुणदोष चांगले लक्षांत येतात. दारूबंदीच्या बाबतींत जो आचरटपणा आणि अत्याचार कांग्रेस सरकारने केला, तशाच प्रकारचा अत्याचार याहि कायद्यांत केलेला आहे. दुसऱ्याच्या खाजगी जीवनांत निष्कारण ढवळाढवळ करण्याची कांग्रेसची ( म्हणजे अर्थातच गांधींची ) अत्याचारी मनोवृत्ति या कायद्यांत स्पष्ट दिसते. नोकरवर्गाला योग्य ती विश्रांति आणि सवलती मिळाल्या पाहिजेत, याबद्दल मतभेद नाही. मालकवर्ग स्वतःच्या फायद्याकरतां नोकरवर्गाला अतिशय त्रास देतो हें सर्वांना माहीत आहे, आणि त्यांतून नोकरवर्गाची सोडवणूक करण्यासाठी कायदा पाहिजेच होता यांत शंका नाही. पण त्या कायद्याने नोकरवर्गाची सोय करतांना गिऱ्हाइकांची गैरसोय केलीच पाहिजे असें होत नाही. एका विशिष्ट वर्गाच्या सोयीकरतां बहुजनसमाजाची गैरसोय करणें हा अत्याचार नाही तर काय ? उदाहरणार्थ रात्रीं ९ वाजल्यानंतर लोकांना हॉटेलांत बसूनच खातां येईल, माल बाहेर मागवून खातां येणार नाही, असें बंधन घालण्याचे काय प्रयोजन आहे ? यांत कोणाचीहि सोय न होतां जनतेची गैरसोय मात्र होते. मद्यपानासंबंधी असे विलक्षण कायदे असतात, म्हणजे दुकानांत कोणी मद्याची बाटली घेतली तर ती तेथेच संपवली पाहिजे, निदान ती न संपली तरी घरीं नेतां येणार नाही, असें बंधन पुष्कळ ठिकाणीं असतें. या बंधनाचा परिणाम मात्र असा होतो की गिऱ्हाईक ती तेथेच संपण्याचा प्रयत्न करतो आणि अशा रीतीने त्याच्या पोटांत फाजील दारू जाते. यापासून कोणाचा फायदा झाला ? खाण्याच्या बाबतींत तरी असा निर्बंध कां घालावा ? घेतलेला जिन्नस खपत नाही असें दिसल्यास राहिलेला घरीं नेण्यास बंदी कां ? किंवा एखाद्या मनुष्याला कांही कारणाने दुकानांत जाणें शक्य नसलें तर त्याने पदार्थ घरीं मागवून कां खाऊं नयेत ? निदान घरीं मागवणें तर ते ९ वाजण्यापूर्वींच मागवले पाहिजेत, हा काय समंजस कायदा आहे ? हा निव्वळ कायदेपंडितांचा मूर्खपणा तरी आहे, किंवा जाणूनबुजून लोकांना छळण्याची बुद्धि आहे. वीरकरांनी मुलाखत दिली त्यांत आणखीहि एक अडचण दाखवली आहे. एखाद्या आजारी माणसाला बर्फ

लागलें, किंवा लहान मुलाला दूध लागलें, तरी देखील या कायद्यामुळे तें ९ वाज-
ल्यानंतर मिळायचें नाही. हा काय कायदा झाला? वीरकर म्हणतात, आपल्याच लोकांनी कायदा केलेला आहे. त्याचा कांही दिवस अनुभव आला म्हणजे त्यांतील दोष दिसतील आणि मग ते काढून टाकतां येतील. पण कांग्रेसच्या मंत्रिमंडळांत बहुतेक कायदेपंडितच होते, त्यांना हे दोष कायदा करतांनाच कां दिसूं नये? हे निष्कारण निर्बंध घालण्याचा प्रयत्नच कां करावा? कायदा आपल्याच लोकांनी केलेला आहे ही सबब फोल आहे. परक्यांनी कायदा केला तर ते बोलूनचालून परके, त्यांना आमच्या अडचणी कशा कळणार, असें म्हणतां येईल. पण आपल्या लोकांना तर जास्त अक्कल असावी? तें कांही नाही, या कांग्रेसवाल्यांची बुद्धिच अत्याचारी. मी म्हणेन तसें लोकांनी वागलें पाहिजे, ही अरेरावीच याच्या मुळाशीं आहे. अमुक दिवशीं कोणीं जेवूं नये किंवा बोलूं नये असा कायदा यांच्या कारकीर्दीत झाला नाही हेंच नशीब.

वीरकर बोलूनचालून कांग्रेसच्या बाजूचे. ते म्हणतात, शहरांतील नागरिकांना वाटेल त्या वेळीं–अवेळीं हाटेलांत जाऊन खाण्याची किंवा हाटेलांतील जिन्नस मागवण्याची जी संवय जडलेली आहे, तिला या कायद्याच्या बंधनाने बराच आळा पडेल, आणि वेळच्या वेळीं शिस्तीने खाण्यापिण्याची संवय लावून घेण्यास या बंधनाची बरीचशी मदत होईल. पण ९ वाजल्यावर देखिल दुकानांत जाऊन जर खातां येतें, तर मग यांत शिस्त कोठें आली? जिन्नस बाहेर मागवल्यानेच तेवढी शिस्त बिघडते काय? आणि आमच्या खाण्यापिण्याच्या वेळा कांग्रेस कोण ठरवणार? आम्ही नवांच्या पुढे जेवलों तर कांग्रेसच्या बापाचें काय जातें? ही झोटिंगशाही कां? बरें हा कायदा नोकरवर्गाच्या हितासाठीं केला आहे हें जर खरें, तर गिऱ्हाइकांवर हा जुलूम केल्याने नोकरांचें कोणतें हित साधलें? यांत नोकरांचा संबंधच नाही. गिऱ्हाइकाने जिन्नस दुकानांत खाल्ला काय किंवा बाहेर नेला काय, नोकरांना सारखच. इत-
केंच नव्हे तर जिन्नस बाहेर गेला तर कपबशा धुण्याचें काम कमी होतें. जिन्नस घेऊन नोकराला बाहेर पाठवूं नये, असा कायदा असता तर त्यांत नोकरांचा

कांही संबंध आला असता, पण त्यानेहि नोकरांचें हित साधत नाहीच. उलट बाहेर जायला मिळाल्याने नोकरांना बरेंच वाटेल. असला कायदा करण्यांत नोकरांचें हित करण्याच्या मिषाने गिऱ्हाइकांवर जुलूम करण्याची संधि साधली आहे, कारण जुलूम केल्याशीवाय अधिकार गाजवण्याचें समाधान मिळत नाही! कांग्रेसने राजकीय दृष्ट्या जें कांही कार्य केलें तें कोणी नाकबूल करीत नाही, पण त्यावर असल्या अत्याचारामुळे विरजण पडतें. आपले लोक झाले म्हणून त्यांच्या असल्या अत्याचाराला कोणीहि समंजस मनुष्य पाठिंबा देणार नाही.

वैयक्तिक टीकेसंबंधी कल्याणला जेव्हा ठराव आला, तेव्हा त्यावर दौंडकर वकिलांनी जें वक्तृत्व केलें तें ऐकून पुष्कळ लोक थक्क झाले असतील. ते ठरावाच्या बाजूने बोलले, पण लोकांनी व्यायामशाळांत जाऊन संपादकांना चोप देण्याची शक्ति अंगांत आणली तर अशा ठरावाचें कारण पडणार नाही, असें त्यांनी सांगितलें. असल्या बेकायदा मार्गाचा अवलंब करण्याचा उपदेश निदान वकिलांनी तरी करायला नको होता. शिवाय या बाबतींत बाबूराव पटेलांना जो धडा मिळाला, त्यांत शारीरिक बलाचा विशेष उपयोग होता असें वाटत नाही. बायकांच्या अंगावर हात टाकायला पुरुष सहसा धजत नाहीत, ही त्यांत महत्वाची गोष्ट होती. एरवीं शांता आपटे बाबूराव पटेलांना कुस्तींत मारूं शकेल असें म्हणायला जागा नाही.पण यांत दुसरी गोष्ट अशी की चोप देणें हा एकदां योग्य उपाय ठरला, म्हणजे स्वतःच्या अंगांत शक्ति नसली तर कांही गुंड बरोबर नेऊन देखील संपादकांना चोप देतां येईल. आणि मग वैयक्तिक टीका जरी अत्यंत योग्य आणि मर्यादित असली, तरी देखील ती पसंत नसली म्हणजे संपादकाला चोप द्यायला हरकत नाही. संपादकाला चोप दिल्यावर त्याने फिर्याद केली तर चोप देणाराला शिक्षा होईल हें नक्की, मग तो संपादक कितीहि अपराधी असो. अशा रीतीनें खटले वाढून वकिलांचें फावेल हें खरें, तथापि वकिलांनी असा सल्ला देणें बरें नव्हे. कायद्याचा आब वकिलांनी राखला नाही तर कोण राखणार?

तुझी **शारदा**

---